# बिहारमध्ये सरकार स्थापनेच्या हालचालींना वेग



**पाटणा :** बिहार विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या प्रचंड विजयानंतर राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) राज्यात सरकार स्थापन करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. जदयूचे कार्यकारी अध्यक्ष संजय झा आणि केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनीही शनिवारी संध्याकाळी नवी दिल्लीत भाजपचे वरिष्ठ नेते, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. या बैठकीत नवीन सरकार स्थापनेबाबत प्राथमिक चर्चा झाल्याचे वृत्त आहे, तर केंद्रीय मंत्री आणि लोक जनशक्ती पक्ष (राम विलास)चे अध्यक्ष चिराग पासवान, हिंदुस्थानी अवाम मोर्चाचे अध्यक्ष संतोष सुमन यांच्यासह एनडीएच्या घटक पक्षांच्या नेत्यांनी पाटणा येथे जदयूचे अध्यक्ष आणि मुख्यमंत्री नितीश कुमार यांची भेट घेतली. दरम्यान, जदयू विधीमंडळ पक्षाची बैठक सोमवारी (दि. १७) होणार असून या वेळी पक्षाचे अध्यक्ष नितीश कुमार यांची विधीमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड होईल.


रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १२०

www.ramprahar.com

◆ सोमवार, १७ नोव्हेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २


## अंतरंग


कर्जत शहरात कारची सहा मोटरसायकलींना धडक/२

रायगड जिल्ह्यात गुलाबी थंडी, पर्यटनवाढीला चालना/५

आफ्रिकेविरुद्ध टीम इंडियाचा लाजिरवाणा पराभव/८


# स्थानिक परिस्थितीनुसार जागावाटप होईल

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची निवडणुकांसंदर्भात माहिती

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महायुतीच्या जागावाटपाचे चित्र परवापर्यंत स्पष्ट होईल. ही राज्याची निवडणूक नाही. त्यामुळे स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय होईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि. १६) दिली. ते छत्रपती संभाजीनगर येथे बोलत होते.



जागावाटपाबाबत बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, स्थानिक निवडणुकांच्या जागावाटपाचे निर्णय वरून होत नाही, तर ते जिल्हास्तरावर होतात. त्यामुळे जिल्हास्तरावर त्या-त्या पक्षांनी एकत्र येऊन त्याबाबत ठरवलेले आहे. काही ठिकाणी महायुती झाली आहे, काही ठिकाणी दोन पक्ष एकत्र आले आहेत, तर काही ठिकाणी युतीच झालेली नाही. स्थानिक परिस्थितीनुसार निर्णय घेतला जाईल. महापालिकेतील निकष वेगळे असतात. त्यामुळे जिथे शक्य आहे, तिथे आमची युती होणार, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

### विरोधकांना जनताच जागा दाखवेल!

छत्रपती संभाजीनगर येथे भाजप विभागीय कार्यालय उद्घाटन समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बिहारमधील निवडणुकीचा दाखला देत विरोधकांवर हल्लाबोल केला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बिहार विधानसभा निवडणुकीत जनतेने आपल्या देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विश्वास दाखवला. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या पक्षावर विश्वास दाखवून विरोधकांचा सुपडा साफ केला. त्यामुळे सर्वांचे आभार मानत पंतप्रधानांचे अभिनंदन करतो. भाजपचा रथ पुढे जातोय. खोट्या चर्चांना जनता उत्तर देत आहे. विरोधक कधी मतांची चोरीसारखे मुद्दे काढतात. न्यायालय आणि निवडणूक आयोग पुरावा मागतात, त्यावेळी त्यांच्याकडे काही नसते. आगामी निवडणुकांमध्ये असेच यांना मातीत मिळवल्याशिवाय जनता राहणार नाही.

# जबाबदार २५ जणांकडून केली जाणार ५९८.७२ कोटींची वसुली

## सहकार आयुक्तांनी निश्चित केली जबाबदारी

**मुंबई : प्रतिनिधी**

पेण को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक घोटाळ्यातील २५ आरोपींवर प्रत्येकी २३ कोटी ९० लाख रुपयांची सामूहिक व वैयक्तिक वसुलीची जबाबदारी सहकार आयुक्तांनी निश्चित केली आहे. ठरलेल्या मुदतीत ही रक्कम वसूल न झाल्यास संबंधित संचालक व जबाबदार व्यक्तींवर व्याजासकट वसुली करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. या घोटाळ्याची एकूण रक्कम ५९८.७२ कोटी रुपये असून ती माजी संचालक व कर्मचारी अशा २५ जणांवर विभागली आहे.




बँकेचे संचालक शिशिर धारकर, जयवंत गुरव, जयंतीलाल पुनामिया, संतोष श्रृंगारपुरे, मिलिंद पाडगावकर, हरिश्चंद्र पाटील, अनिल डेरे तसेच बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुरुषोत्तम जोशी, गिरिष गुप्ते, दिनेश सावंत आणि संगणक ऑपरेटर अजय मोकल यांचाही या घोटाळ्यात सहभाग असल्याची नोंद चौकशीत करण्यात आली आहे. या २५ जणांवर ५९७ कोटी रुपयांची थेट व वैयक्तिक वसुली लादण्यात आली आहे.

मागील १५ वर्षांपासून ठेवी मिळविण्यासाठी ग्राहक सतत पेण अर्बन बँक संघर्ष करीत आहेत, मात्र विशेष कृती समितीकडून दिरंगाई होत असल्याचा आरोप संघर्ष समितीचे अध्यक्ष नरेन जाधव यांनी केला आहे.

# 'राहुल गांधींमुळे काँग्रेसच्या तरुण खासदारांचे भवितव्य धोक्यात'

**सुरत : वृत्तसंस्था**

गुजरात दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेसमधील अंतर्गत वादावर पंतप्रधानांचा निशाणा साधला आहे. काँग्रेस पक्ष संसदेत आपल्या तरुण खासदारांना बोलू देत नाही आणि त्यामुळे त्यांचा राजकीय प्रवास धोक्यात येत आहे, असे पीएम मोदींनी म्हटले आहे.

सुरत येथील कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, काँग्रेसवाले संसदेत गोंदळ घालतात, सभात्याग करतात. त्यामुळे त्यांचे तरुण खासदार आपली मते मांडू शकत नाहीत. काँग्रेस आणि इंडिया आघाडीतील तरुण खासदार आम्हाला सांगतात की, आम्हाला बोलण्याची संधीच मिळत नाही. आम्हाला आमच्या मतदारसंघातील मुद्दे संसदेत मांडू उपस्थित करता येत नसल्याने करिअर धोक्यात आले आहे. काही खासदार तर सांगतात की, आम्हाला मतदारांना उत्तर देणेही अवघड होत आहे. आगामी हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर ही परिस्थिती चिंताजनक आहे.

# कर्जतमध्ये डॉ. स्वाती लाड महायुतीकडून नगराध्यक्षपदाच्या उमेदवार

## पत्रकार परिषदेत घोषणा; सर्व उमेदवार आज करणार अर्ज दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भारतीय जनता पक्ष, शिवसेना, आरपीआय महायुतीकडून डॉ. स्वाती अक्षय लाड यांचे नाव नगराध्यक्षपदासाठी जाहीर करण्यात आले आहे. डॉ. लाड तसेच नगरसेवकपदाचे उमेदवार सोमवारी (दि. १७) आपले अर्ज निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे दाखल करणार आहेत.



कर्जत दहिवली येथील संकल्प भवनच्या सभागृहात शनिवारी (दि. १६) झालेल्या महायुतीच्या पत्रकार परिषदेस भाजपचे रायगड जिल्हा निवडणूक प्रभारी व पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, कर्जतचे आमदार महेंद्र थोरवे, माजी आमदार सुरेश लाड, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, शिवसेना जिल्हाप्रमुख संतोष भोईर, वसंत भोईर, दीपक बेहेरे, तानाजी चव्हाण, मनोहर थोरवे, शरद लाड, संकेत भासे, तानाजी चव्हाण आदी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, कार्यकर्ता हा शेवटच्या मतदारापर्यंत पोहचत असतो. त्याचे मन राखून आणि सर्वांना विश्वासात घेऊन आम्ही काम करतो. भाजप नेते सुरेश लाड यांच्या कामाची पद्धत आणि त्यांचा लोकसंपर्क पाहता या निवडणुकीत त्यांच्या कुटुंबातील उमेदवार आम्ही दिला आहे. त्यामुळे महायुती भक्कम झाली आहे.

आम्ही कर्जत, माथेरान आणि खोपोली या तीनही नगर परिषदेच्या निवडणुकांना एकदिलाने सामोरे जाऊन महायुतीचा झेंडा फडकवू, असा विश्वासही आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला. **(पान २ वर..)**

## निवडक

### छत्तीसगडमध्ये चकमकीत तीन नक्षलवाद्यांचा खात्मा

**रायपूर :** छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात रविवारी (दि. १६) सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत तीन नक्षलवादी ठार झाले. यात दोन महिला नक्षलवाद्यांचा समावेश आहे. या तिघांवर १५ लाख रुपयांचे बक्षीस होते. घटनास्थळावरून एक रायफल, बीजीएल लॉन्चर्स, इतर शस्त्रास्त्रे आणि स्फोटके जप्त करण्यात आली आहेत. तुमालपाड भागातल्या जंगलात नक्षलवाद्यांचा वावर असल्याची खबर मिळाल्यानंतर जिल्हा राखीव दलाच्या एका पथकाने शोधमोहीम सुरू केली आणि तिघांचा खात्मा केला.

### सायबर फसवणूकप्रकरणी बंगळुरूमध्ये २१ जणांना अटक

**बंगळुरू :** सायबर पोलिसांनी बंगळुरूमध्ये मोठी कारवाई केली आहे. सीआयडी कार्यालयात नव्यानं स्थापन झालेल्या सायबर कमांड सेंटरने (सीसीसी) २१ सायबर फसवणूक करणाऱ्यांना अटक केली आहे. हे आरोपी बंगळुरूमध्ये राहणाऱ्या अमेरिकन नागरिकांसह अनेकांना धमकावण्यासाठी आणि फसवणूक करण्यासाठी मायक्रोसॉफ्टच्या नावाचा वापर करत होते.

# 'कोपसाप'चा गौरव सोहळा, कविसंमेलन उत्साहात




या बातमीचा व्हिडीओ पाहण्यासाठी हा क्यूआर कोड स्कॅन करा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल, पनवेल शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला साहित्यिकांचा गौरव सोहळा आणि कविसंमेलन हा साहित्यशील, संस्कृतीप्रधान व रसिकतेने नटलेला कार्यक्रम शनिवारी (दि. १५) सायंकाळी मार्केट यार्डमधील मंडळाच्या सभागृहात उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

या कार्यक्रमाला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, माजी उपमहापौर व जिल्हा सरचिटणीस चारुशीला घरत यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. **(पान २ वर..)**

### शब्दांची मैफल मनाला नवी ऊर्जा देते -लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी समारोपाच्या भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, मनाला समाधान पाहिजे असेल, आयुष्याच्या धकाधकीत क्षणभर विश्रांती हवी असेल, तर हिल स्टेशनला जाण्यापेक्षा कविसंमेलनात या. शब्दांची ही मैफल मनाला नवी ऊर्जा देते तसेच त्यांनी सर्व कवींच्या सादरीकरणाचे कौतुक करताना कोमसाप नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी व सहकाऱ्यांचे दर्जेदार आयोजनाबद्दल अभिनंदन केले.

# महाडमध्ये युतीच्या उमेदवारांचे अर्ज दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्ष-राष्ट्रवादी काँग्रेस युतीच्या उमेदवारांचे अर्ज रविवारी (दि. १६) राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे आणि भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशील पाटील यांच्या उपस्थितीत दाखल करण्यात आले. या वेळी काढण्यात आलेल्या भव्य रॅलीमध्ये असंख्य कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी उपस्थिती दाखवत युतीचा विजय निश्चित केला.

जाखमाता मंदिर देवीचे आशीर्वाद घेऊन रॅलीला सुरुवात करण्यात आली. ही रॅली बाजारपेठमार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आल्यावर ठराविक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नगरपालिका कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी महेश शितोळे यांच्या उपस्थितीत युतीचे नगराध्यक्षपदाचे उमेदवार सुदेश कलमकर यांच्यासह सदस्यांचे अर्ज दाखल करण्यात आले.

या रॅलीत महाडच्या माजी नगराध्यक्ष स्नेहल जगताप, भाजप राज्य परिषद सदस्य बिपीन महामुणकर यांच्यासह युतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. आमची ही युती महाड शहराचा कायापालट करणार असल्याचे खासदार तटकरे यांनी या वेळी सांगितले.



# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये विज्ञान आविष्कार स्पर्धा

## पनवेल-उरणमधील १३ शाळांचा सहभाग; विजेत्यांना पारितोषिक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

थोर दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोडमधील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूल येथे भव्य विज्ञान आविष्कार स्पर्धा प्रदर्शनाचे आयोजन शनिवारी (दि. १५) करण्यात आले होते. यामध्ये पनवेल व उरण विभागातील सुमारे १३ शाळांनी सहभाग नोंदविला.

'प्रग्या १.० : द पॉवर ऑफ इनोव्हेशन फॉर अ सस्टेनेबल फ्युचर' या शीर्षकाखाली घेण्यात आलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन शकुंतला रामशेठ ठाकूर आणि अर्चना परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले.

या प्रदर्शनात एआय आधुनिक तंत्रज्ञान व विविध विषयांवर वेगवेगळे प्रयोग विद्यार्थ्यांनी सादर केले.





त्याचप्रमाणे पुरातन विषयांमध्ये ऐतिहासिक रायगड किल्ला, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील नाणी, तलवारी भाले तसेच मराठी, हिंदी व इंग्रजी भाषा विभाग यांची सांगड घालत दर्जेदार प्रयोग मांडण्यात आले होते.

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण सोहळ्यासाठी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, लोकनेते रामशेठ ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रमुख मान्यवर म्हणून सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर सीबीएसई स्कूलचे चेअरमन तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख, स्थानिक स्कूल कमिटी मेंबर कविता खारकर, निलेश खारकर, धीरज ओवळेकर तसेच 'रयत'चे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, पीआरओ बाळासाहेब कारंडे, डी.सी. पाटील, लिपिक संतोष गुजर, मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर, परीक्षक अनिल कौशिक, चेतन कौशिक आदी उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी प्रदर्शनातील प्रयोगांचे कौतुक करत छोट्या शास्त्रज्ञांसाठी प्रयोगशाळा बांधणार असल्याचे आश्वासित केले, तर परेश ठाकूर यांनी, भविष्यामध्ये प्रग्या १.०चे २.०, ३.० होत जाओ, अशा शुभेच्छा दिल्या.

# शालेय सहलीसाठी एसटीच्या नवीन बसेस होणार उपलब्ध

**मुंबई : प्रतिनिधी**

स्वस्त आणि सुरक्षित प्रवासाचा आनंद घेण्यासाठी यंदा शाळा-महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळ नवीन बसेस उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्याचे परिवहनमंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली.

दरवर्षीप्रमाणे दिवाळी सुट्टी संपली की शाळेच्या विद्यार्थ्यांना विविध प्रेक्षणीय स्थळांना भेट देण्यासाठी सहलीचे वेध लागतात. शालेय सहली हा विद्यार्थी जीवनातील अतिशय संस्मरणीय असा अनुभव असतो. राज्य शासन एसटीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय सहलीसाठी त्यांच्या एकूण भाड्यामध्ये ५०% टक्के सवलत देते. त्यामुळे अतिशय माफक दरामध्ये विद्यार्थ्यांना महाराष्ट्रातील विविध धार्मिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देणे शक्य होते. तो त्यांच्या शालेय अभ्यासक्रमातील एक उपक्रम असतो. यंदा एसटीकडे असलेल्या नवीन बसेस या शालेय सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. राज्यभरात असलेल्या एसटीच्या २५१ आगारांमधून दररोज ८०० ते १००० बसेस विविध शाळा-महाविद्यालयांना सहलीसाठी उपलब्ध करून दिल्या जातील, असे मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

मागील वर्षी नोव्हेंबर ते फेब्रुवारीदरम्यान राज्यभरातील विविध शाळा-महाविद्यालयांना शालेय सहलीसाठी एसटी महामंडळाने तब्बल १९६२४ बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. या माध्यमातून एसटीला तब्बल ९२ कोटी रुपयांचा (प्रतिपूर्ती रकमेसह) महसूल प्राप्त झाला होता. यंदाही प्रत्येक आगारातून त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा-महाविद्यालयांना दररोज एसटी बसेस उपलब्ध करून देण्याबाबत आवाहन करण्यात येत आहे.

# खोपोली भाजपमध्ये सानिया शेख यांच्या नेतृत्वाखाली अनेकांचा प्रवेश

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली भारतीय जनता पक्षात दिवसेंदिवस विविध पक्षातून इन्कमिंग सुरूच असून आज क्रांतीनगरच्या सामाजिक कार्यकर्त्या शिवसेनेच्या सानिया शेख यांच्या नेतृत्वाखाली शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपत प्रवेश केला. पक्षाचे वरिष्ठ नेते व आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा महाराजा मंगल कार्यालयात संपन्न झाला.



या कार्यक्रमाला जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस प्रकाश बिनेदार, खोपोली प्रभारी सुनील घरत, अकबर सय्यद, खोपोली निवडणूक प्रमुख यशवंत साबळे, युवा नेते विक्रम साबळे शहराध्यक्ष अजय इंगुलकर, माजी नगराध्यक्ष इंदोरमल खंडेलवाल रमेश रेटरेकर, इत्यादी अनेक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.



प्रभाग क्रमांक सात मधील नामदेव मोरे व सुजाता मोरे यांनी आपल्या समर्थकांसह त्याचप्रमाणे किशोर पाटील यांनी त्यांच्या समर्थकांसह भारतीय जनता पक्षात प्रवेश केला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्य सबका साथ सबका विकास या कार्यक्रमांतर्गत देशातील तळागाळाच्या लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी मोदी सरकारने विविध योजना राबवल्या आहेत कार्यकर्त्यांनी त्या योजना राबविण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन प्रशांत ठाकूर यांनी केले. पक्षात आलेल्या सर्वांना योग्य तो न्याय दिला जाईल, भारतीय जनता पक्ष तुमच्या पाठीशी सदैव व राहील तुमच्या सुखदुःखात पक्ष आजपासून सामील झाला आहे, असेही त्यांनी सांगितले.

सूत्रसंचालन मितेश शहा यांनी केले. दिवसेंदिवस विविध पक्षातील कार्यकर्त्यांचा ओढा भाजपाकडे असल्यामुळे आगामी नगरपरिषद निवडणुकीत महायुतीचे नगराध्यक्ष सहित सर्वच उमेदवार भरघोस मतांनी विजयी होतील आणि नगरपालिकेवर महायुतीचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही, असाही दावा या वेळी करण्यात आला.

# कर्जत शहरात विचित्र अपघात; कारने सहा बाईकना दिली धडक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील नगर परिषदेपासून बुद्धनगर कडे जाणा - या वळणावर काल शनिवारी दुपारी झालेल्या एका विचित्र अपघाताने परिसरात एकच खळबळ माजली. सुदैवाने जीवितहानी टळली असली तरी सहा मोटरसायकलींना धडक देत वेगात आलेली टाटा हरिअर गाडी अखेर बुद्धनगर वस्तीच्या कमानीला जाऊन आदळली.



मिळालेल्या माहितीनुसार, टाटा हरिअर गाडीचा चालक अचानक ब्रेक न लागल्याने वाहन पूर्णपणे अनियंत्रित झाले. समोरून येणाऱ्या दोन बाईकना गाडीने जोराची धडक दिल्यानंतर चालकाने रिव्हर्स टाकण्याचा प्रयत्न केला आणि त्यात पाठीमागे असलेल्या आणखी दोन आणि पुन्हा पुढे जोरात घेऊन दोन मोटरसायकली उडवल्या. त्यानंतर बुद्धनगर समोरील कमानीला आदळली.

या गाडीत दोन व्यक्ती प्रवास करत होत्या. चालकाच्या चुकीमुळे झालेल्या धडकेत गाडीचे एअरबॅग तात्काळ उघडल्याने दोन्ही व्यक्ती गंभीर दुखापतीपासून बचावले. मात्र त्यांना किरकोळ दुखापत झाली आहे. अपघातात रस्त्यावरील दोन व्यक्ती किरकोळ जखमी झाले आहेत. गाडीने बुध्दनगर येथील कमानीला दिलेल्या धडकेत कमानीचे किरकोळ नुकसान झाले आहे. दुपारी साधारण दीड वाजता घडलेल्या या अपघातामुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली होती. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे

## श्रद्धा जोशी यांचा भाजपत प्रवेश, उमेदवारीची घोषणा



**महाड : प्रतिनिधी**

महाड नगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत चवदार तळे येथील सामाजिक कार्यकर्त्या श्रद्धा अखिल जोशी यांनी आज भाजपाच्या कार्यसरणीवर विश्वास ठेवत भाजपात प्रवेश केला. यावेळी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून त्यांना भाजपाच्या वतीने उमेदवारी जाहीर करण्यात आली.

महाड नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाड शहरातील वातावरण राजकीय दृष्ट्या चांगलेच तापले असून प्रत्येक पक्षामध्ये कार्यकर्त्यांना प्रवेशाची प्रक्रिया सुरू असतानाच भारतीय जनता पक्षाच्या कार्यसरणीला प्रभावित होऊन, तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्या विकासाच्या ध्येय दृष्टिकोनावर विश्वास ठेवून येथील सामाजिक कार्यकर्त्या श्रद्धा अखिल जोशी यांनी आज सायंकाळी भारतीय जनता पार्टी कार्यालयात पक्षप्रवेश केला. दरम्यान भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र परिषदेचे सदस्य बिपिन महामुणकर यांनी ही निवडणूक विकासाच्या मुद्द्यावरती असणार आहे आणि महाड शहराचा सर्वांगीन विकास करण्याचे ध्येय भारतीय जनता पार्टीचे असल्याचे त्यांनी यावेळी बोलून दाखवले.

## भालीवडी कन्या आश्रमशाळेत जनजाती गौरव दिवस साजरा

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

जननायक भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त भालीवडी (ता. कर्जत) येथील शासकीय कन्या आश्रमशाळेत जिल्हास्तरीय जनजाती गौरव दिवस कार्यक्रम जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या उपस्थितीत झाला. कार्यक्रमादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आदिवासी समाजासाठीच्या संदेशाचे प्रक्षेपणही करण्यात आले.

जनजाती गौरव दिनाचे औचित्य साधून प्रकल्पामार्फत सात नवीन बहुउद्देशीय केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले. रोहा तालुक्यातील लांढर आदिवासी वाडी येथील केंद्राचे उद्घाटन मंत्री अदिती तटकरे यांच्या शुभहस्ते झाले. या केंद्रांद्वारे आदिवासी समाजाचे शैक्षणिक, सामाजिक सक्षमीकरण व शासकीय योजना गावागावात पोहोचविण्याचा उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# नवीन शैक्षणिक धोरण युवा पिढीचे भवितव्य घडवणारे -मंत्री चंद्रकांत पाटील



**मुंबई : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण युवा पिढीचे भवितव्य घडवणारे आहे. हे शैक्षणिक धोरण अतिशय व्यावहारिक तसेच सर्जनशीलतेस बळ देणारे आणि आधुनिक स्पर्धेत विद्यार्थ्यांना पुढे नेणारे आहे, असे प्रतिपादन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

विलेपार्ले येथील प्रबोधनकार ठाकरे क्रीडा संकुल येथे डिझाईन क्षेत्रातील भविष्यातील संधीसाठी उर्मीज आर्ट फोरमतर्फे आयोजित 'नेक्स्ट इन डिझाईन फ्युचर' या युएएफ एक्सपोचे उद्घाटन मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते झाले.

नवे शैक्षणिक धोरण व्यावहारिक असून, यात संशोधनावरही भर देण्यात आला आहे. याशिवाय नव उद्योजक, स्टार्टर्स अप यांना प्रोत्साहन दिले जात आहे. त्यासाठी कमी व्याजावर कर्ज उपलब्ध करून दिले जात असून, बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडून मदतही केली जात आहे. यातूनच स्टार्टअपच्या क्षेत्रात भारत आघाडीवर आहे. मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले की, उर्मीजच्या कला मंचातर्फे डिझाईनला शालेय स्तरावरील सर्जनशीलता आणि करिअरच्या संधी तसेच एक्स्पोच्या माध्यमातून एकाच छताखाली पोर्टफोलिओ प्रदर्शन, करिअर समुपदेशन, विद्यापीठ भागीदारी आणि उद्योग संवाद आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणारे असे उपक्रम प्रेरणादायी ठरतील. अशा उर्मीजच्या कला मंचा एक्स्पोमुळे महाराष्ट्रातील डिझाइन गुणवत्तेला राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर संधी उपलब्ध होतील.

मुलांच्या शिक्षणात आणि विकासात कला आणि सर्जनशील विषयांची भूमिका महत्त्वाची असते. डिझाइन हा आपल्या जीवनाच्या प्रत्येक पैलूचा अविभाज्य भाग बनला आहे, डिझाईन आता केवळ चित्रकलेपुरते मर्यादित न राहता विज्ञान, सौंदर्यशास्त्र, मानवी गरजा आणि तंत्रज्ञान यांचा समन्वय साधणारे एक व्यापक व्यावसायिक क्षेत्र आहे. एक्स्पोचे आयोजन हे महाराष्ट्रातील सर्जनशीलतेला योग्य दिशा देणारे पाऊल ठरणार आहे, असे मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी सांगितले.

यावेळी व्यासपीठावर आमदार पराग अळवणी, उर्मीज आर्ट फोरमच्या संस्थापिका, राष्ट्रपती पुरस्कार विजेत्या कोमल उल्लाल, गुरुचरण सिंग संधू, क्रीडा संकुलाचे अध्यक्ष अरविंद रमेश प्रभू, मोहन वेदपाठक आदी उपस्थित होते.

## कर्जत नगर परिषद निवडणुकीसाठी एकाच दिवशी ५६ उमेदवारी अर्ज दाखल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत नगरपरिषदेच्या निवडणुकीसाठी चौथ्या दिवशी पहिला उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. त्यानंतर पाचव्या दिवशी दोन आणि आज तब्बल ५६ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. आजपर्यंत एकूण ५९ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले आहेत. हे अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांच्याकडे दाखल केला.

नगरपरिषदेच्या निवडणुकीचे उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी अवघा एक दिवस शिल्लक आहे. काहींनी ऑनलाईन उमेदवारी अर्ज दाखल केले. आज नगराध्यक्ष पदासाठी कर्जत परिवर्तन आघाडीच्यावतीने नगराध्यक्ष पदासाठी पुष्पा हरिश्चंद्र दगडे यांनी आपले दोन उमेदवारी अर्ज दाखल केला. तसेच एक ते दहा प्रभागांमध्ये ५४ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यामध्ये अपक्ष उमेदवारांनीही अर्ज दाखल केले.

# पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचचे साकडे

**पोलादपूर : प्रतिनिधी**

नगरपंचायत पोलादपूरच्या घरपट्टीवाढीबाबत खासदार सुनील तटकरे यांना पोलादपूर नागरिक समस्या निवारण मंचातर्फे महाड येथे निवेदन देण्यात आल्यानंतर त्यांनी पोलादपूरांच्या वाढीव घरपट्टीबाबत रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्यासोबत चर्चा करून पोलादपूरकरांना वाढीव घरपट्टीच्या सदोष मूल्यांकन पध्दतीविषयी दिलासा देण्याची अनूकूलता निर्माण केली आहे.



मंचाचे शिष्टमंडळ अन्याय्य घरपट्टी वाढीविरोधात महायुतीचे अन्य नेते मंत्री भरत गोगावले आणि कॅबिनेटमंत्री दर्जा असलेले आ.प्रवीण दरेकर यांनाही निवेदन देऊन याप्रश्नी पाठपुरावा करून अनुकूलता वाढविणार आहेत.

पान १ वरुन

## कर्जतमध्ये डॉ. स्वाती लाड महायुतीकडून नगराध्यक्षपदाच्या उमेदवार

आमदार महेंद्र थोरवे यांनी, या निवडणुकीत शिवसेना १२, भाजप सात आणि आरपीआय दोन असे जागावाटप ठरले असून बहुतांश उमेदवार निश्चित झाले आहेत. एक दोन जागांबाबत निर्णय होणे बाकी आहे. तो लवकरच घेण्यात येईल, असे सांगितले.

माजी आमदार सुरेश लाड यांनी, कुणावरही अन्याय होऊ नये म्हणून मी सुरुवातीला नगराध्यक्षपदाची उमेदवारी आमच्या कुटुंबात घेत नव्हतो, मात्र पक्ष नेतृत्वाने सांगितल्यावर मी भावकीला व गावकीला विश्वासात घेऊन पक्ष नेतृत्वाशी चर्चा केली. त्यानंतर आम्ही आमच्या कुटुंबात उमेदवारी घेतली.' असे स्पष्ट केले.

जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी स्वागत केले आणि आपण युतीच्या माध्यमातून निवडणुकीला सामोरे जात आहोत. आपल्या युतीच्या वतीने नगराध्यक्षपदाच्या उमेदवार डॉ. स्वाती लाड या आहेत, असे सांगितले. संतोष भोईर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## 'कोपसाप'चा गौरव सोहळा, कविसंमेलन उत्साहात

कोमसाप पनवेल शाखेचे माजी अध्यक्ष रोहिदास पोटे यांच्या गझलगंधाक्षरी ग्रंथाला प्रभाकर पाटे स्मृती समीक्षा पुरस्कार मिळाल्याबद्दल या वेळी त्यांचा विशेष गौरव करण्यात आला. नवीन पनवेल शाखेचे माजी अध्यक्ष प्रा. चंद्रकांत मढवी यांनाही उधळ्या कांदबरीला वि.वा. हडप स्मृती विशेष पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. याशिवाय नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी यांची केंद्रीय कार्यकारिणीवर निवड झाल्याबद्दल व शाखेच्या सक्रिय सदस्य योगिनी वैदू यांना रायगड जिल्हा परिषदेचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मान केला गेला. ज्येष्ठ पत्रकार संजय कदम यांची राज्य शासनाच्या वंदे मातरम् गीताच्या १५०व्या वर्धापन दिन समितीवर तालुकास्तरीय प्रतिनिधी म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचाही गौरव करण्यात आला.

या वेळी कविसंमेलन रंगले. सुप्रसिद्ध हास्यकवी अशोक नायगावकर, प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे, ज्येष्ठ गझलकार अे.के. शेख यांच्यासह उपस्थित कवींनी सादर केलेल्या कवितांनी सभागृह भारावून गेले. सामाजिक वास्तव, मानवी नात्यांची उब, निसर्ग, अनुभवांचे रंग आणि भावविश्वाचे विविध पैलू कवितांमधून खुलून आले. या संमेलनाने पनवेलमधील साहित्यिक वातावरणाला नवी ऊर्जा मिळाली.

## विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी एक अनोखी दिशा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ, पनवेल संचलित श्री बापूसाहेब डी. डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन, नवी पनवेल आणि पुणे इंस्टीट्युट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थी सामर्थ्य जागवणाऱ्या स्टुडंट डॅव्हलपमेंट प्रोग्राम अंतर्गत How to Create a Powerful Resume या विषयावर ज्ञानरचना घडवणारे मनोवेधक शनिवार (दि.१५)रोजी सत्र आयोजित करण्यात आले.होते

विशेष मार्गदर्शक म्हणून निखिल नैनानी यांनी विद्यार्थ्यांना प्रभावी रेझ्युमे घडविण्याची कला, सूक्ष्म तंत्र आणि व्यावसायिकतेचे मर्म समजावून सांगत भविष्य वाटचाल अधिक सबळ केली. कार्यक्रम यशस्वी करण्यामध्ये या कार्यक्रमाचे समन्वयक मयुर पटेल यांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकास आणि प्रगतीचा नवा अध्याय अंकित करणारा हा उपक्रम सर्वार्थाने यशस्वी, प्रेरणादायी आणि अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे नियोजन, समन्वय आणि पार पडण्यामध्ये महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सीमा कांबळे, उपप्राचार्य डॉ. विनायक लोहार,यांनी केले



## म्हसळा तालुका शांतता समितीची सभा

**म्हसळा : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूका,दिल्ली बॉम्बब्लास्ट पार्श्वभूमीवर सतर्कतेच्या दृष्टीकोनांतून म्हसळा पोलिसांकडून शांतता समितीची बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सहाय्यक पोलिस निरीक्षक रवींद्र पारखे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला सर्व समाजांचे अध्यक्ष,पोलीस उप निरीक्षक सुनिल कोहीनकर, ज्ञानेश्वर एडवळे, विविध पदाधिकारी गणेश मंडळ प्रतिनिधी,प्रतिष्ठित नागरिक, राजकीय मंडळी तसेच शांतता समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते



म्हसळा पोलिसांनी शांतता समितीची विशेष बैठक आयोजित केले आसल्याचे पारखे यानी प्रस्तावनेत सांगितले. तालुक्याच्या भौगोलिक स्थितीचा विचार करून पोलीस पशासन आंबेत खाडी पट्टा, संदेरी, तोराडी, पांगलोली या तालुलक्यांतील दूरच्या ठिकाणी पोहचणार त्यापेक्षा, नागरिकानी संपर्क साधावा असे आवाहन पोलीसांमार्फत उपस्थिताना करण्यांत आले. नाका तपासणी वाढवावी, सतर्क गस्त ठेवावी आणि सीसीटीव्ही यंत्रणेला अधिक बळकटी द्यावी अशी सूचना करण्यात आली.

बैठकीस माजी सभापती महादेव पाटील,उ पनगराध्यक्ष अनिकेत पानसरे, मुस्लिम समाज अध्यक्ष महमदअली पेणकर,उपाध्यक्ष डॉ. मुब्बशीर जमादार, सलीम उकये, हिंदू समाज सचिव सुशिल यादव, अशोक काते, नगरसेवक सुफीयान हळदे, सुहेब हळदे, योगेश करडे, सुरेश कुडेकर, बाबू बनकर, समीर काळोखे, सुहेल घराडे, अनिल बसवत, नाना सावंत, किरण पालांडे, सौरव गोरेगावकर, कांतीभाऊ जैन, हेमंत नक्ती, दीपल शिर्के आदी उपस्थित होते.

## निवडक

### तळोजात साडेपाच लाखांची चोरी

**पनवेल :** घराच्या गॅलरीतून घरात घुसून, घरातील सोन्याचे दागिने मोबाईल व रोख रक्कम अज्ञात व्यक्तीने लुबाडली आहे. सव्वा पाच लाखांच्या या चोरीबाबत तळोजा पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तळोजा फेज १ मधील तळघराच्या एका घराच्या गॅलरीतून, एका अज्ञात इसमाने घरात प्रवेश केला. घरातील कपाटातून पाच लाख १० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने, १५ हजार रुपयांचे मोबाईल व २० हजार रुपयांची रोख रक्कम, असा एकूण पाच लाख ४५ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

### ई-सिगारेट विक्रीप्रकरणी गुन्हा दाखल

**पनवेल :** ई सिगारेट विक्रीप्रकरणी खारघर पोलिस ठाण्यात अर्षद मोहम्मद सलीम शेख आणि मिथलेश माणिकचंद साहू यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.सी लाईन आयटीएम कॉलेजजवळील कॅफे नाईन पान शॉप आणि सौरभ पान शॉप सेक्टर चार, बेलपाडा, खारघर येथे कॅफे नाईन पान शॉपमध्ये अर्षद मोहम्मद सलीम शेख आणि सौरभ पान शॉपमध्ये मिथलेश माणिकचंद साहू यांच्याकडे प्रतिबंधित सिगारेट सापडून आले. ३४ हजारांचे १७ई-सिगारेट पोलिसांनी जप्त केले. पनवेल, कळंबोली, खारघर, कामोठे, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, तळोजा आदी परिसरात ई-सिगारेट खुलेआमपणे विकले आत आहेत. विशेष करून ज्या ठिकाणी कॉलेज आहेत त्या ठिकाणी पाई सिगारेटची विक्री होत असल्याचे समोर आले आहे.



**पनवेल : आई एकवीरा ग्रुप चौक परिसर आयोजित पायी पालखी सोहळ्यात माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांनी सहभागी होत एकवीरा देवीचे दर्शन घेतले.**

# पनवेलमध्ये आजपासून कुष्ठरोग शोधमोहीम

## आशा सेविका व स्वयंसेवक देणार भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रात १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत कुष्ठरोग शोध मोहीम अभियान राबविण्यात येणार असून २०२७ पर्यंत जिल्ह्यात कुष्ठरोग्याची संख्या शून्यावर आणण्यासाठी 'शून्य कुष्ठरुग्ण प्रसार' हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी महापालिका प्रशासन काम करीत आहे. या मोहिमेदरम्यान आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरी भागातील जोखीमग्रस्त लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.

या मोहिमेंतर्गत आशा सेविका, परिचारिका, स्वयंसेवक घरोघरी जाऊन भेटी देणार असून लोकसंख्यांचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान घरी येणाऱ्या पथकास नागरिकांनी सहकार्य करण्याचे आवाहन मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. आनंद गोसावी यांनी केले आहे.

कुष्ठरोग हा मायक्रोबॅक्टेरियम लेप्रे नावाच्या जंतूमुळे होतो. या जंतूमुळे त्वचेवर व शरीराच्या नसा इतर अवयवावर परिणाम होतो. या मोहिमेदरम्यान शहरी भागातील ३०टक्के जोखीमग्रस्त लोकसंख्येचे प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे. या मोहिमेत तीन लाख तीन हजार लोकसंख्येचे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या मोहिमेसाठी पालिका क्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र निहाय विशेष पथकांतर्गत २०३आशा सेविका व ४३ पर्यवेक्षकांची नेमणूक करण्यात आली आहे. नुकतेच यांना सर्वेक्षणासाठी प्रशिक्षण देण्यात आले असल्याची माहिती पालिकेच्या कुष्ठरोग अधिकारी डॉ.उषा राठोड यांनी दिली आहे.

### कुष्ठरोगाची लक्षणे

शरीराच्या कुठल्याही भागावर फिकट लालसर न खाजणारा बधीर चट्टा-डाग, जाड बधीर तेलकट त्वचा, त्वचेवर लहान लालसर गाठी असणे, कानाच्या पाळ्या जाड होणे, त्वचेवर थंड व गरम संवेदना न जाणवणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्णपणे बंद करता न येणे, हातातून वस्तू गळून पडणे, हाताची व पायाची बोटे वाकडे असणे, हात मानेपासून पाय घोट्यापासून लुळा पडणे.

## गव्हाण विद्यालयात मुलींना स्वसंरक्षणाचे धडे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शिवम चारिटेबल ट्रस्ट बदलापूर, ठाणे च्या विभुती सुर्वे यांनी शनिवारी मुलींसाठी स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे आयोजन केले.

या वेळी शिवम चारिटेबल ट्रस्ट तर्फे विभूती सुर्वे, विष्णू सुर्वे तसेच कम्बॅक्ट खारघर या अकॅडमीचे प्रमुख अनिकेत जाधव आणि त्यांचे शिष्य आरिफ शेख यांनी विशेष प्रशिक्षण विद्यालयातील मुलींना दिले. यावेळी किक बॉक्सिंग प्रॅक्टिकल सेल्फ डिफेन्स, नेक चोक, कॉलर ग्रेप, विपन्स या प्रकारांचे प्रात्यक्षिक करून दाखवले. या वेळी इयत्ता नववी आणि दहावीच्या मुलींनी अगदी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थिनींनी या प्रशिक्षणा चा लाभ झाला. इयत्ता नववी ब मधील आर्या अनिल कडू आणि वैष्णवी कृष्णा चिकणे या विद्यार्थिनींनी विशेष रस दाखवून स्वतः प्रात्यक्षिके सादर केली.

सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख हर्षला पाटील यांनी केले तर सांगता विद्यालयाचे क्रीडाशिक्षक सुरेश पारखे यांनी केले. प्रशिक्षणास विद्यालयाच्या प्राचार्या जे.एस. ठाकूर, उप मुख्याध्यापक विलासराव लेंबे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर आर.एस.भोईर लाइफ वर्कर डी. के.म्हात्रे यांनी प्रोत्साहन दिले.

## सोनसाखळी चोरणारा सराईत गुन्हेगार खारघर पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहत परिसरात मोटर सायकल वरून सोनसाखळी हिसकावून फरार आरोपींचे अनेक गुन्हे घडत आहे. अशातील एक सराईत गुन्हेगाराला खारघर पोलिसांनी नाशिक मालेगाव परिसरातून शिताफीने ताब्यात घेतले.

या आरोपीचे नाव हैदरअली सादिक अली सय्यद (वय ३७) असे असून आरोपीवर खारघर पोलीस ठाण्यातील तीन गुन्हे तसेच नाशिक येथील एक गुन्हा उघडकीस आला आहे. आरोपी याचा ठावठिकाणा हा आंबिवली, भिवंडी परिसरातून फरार होऊन लपून बसल्याने काहीएक माहिती पोलिसांना मिळत नव्हती. मागील १०-१२ दिवसांपूर्वी सदर आरोपी हा मालेगाव परिसरात लपून बसला असलेबाबत माहिती मिळाली.



त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि शरद बरकडे, पोउपनि सुरज कदम, जाधव, सहायक पोलीस फिरोज आगा, पोहवा कासार, खेडकर, खैरे, माळी आदींचे पथक येथे रवाना करून सलग सात दिवस खारघर गुन्हे प्रकटीकरण पथकाने अनेक वेगवेगळ्या पद्धतीने वेषभूषा परिधान करून आरोपीवर पाळत ठेवुन आरोपीचे राहते परिसराबाबत माहिती घेतली.

आरोपीचे नियमित येण्या जाण्याचा मार्ग निश्चित करून टी पॉइंट जागेवरील तिन्ही बाजूने सापाळा रचून आरोपी जेवणासाठी जात असताना धावत्या मोटार सायकल वर झडप घालून ताब्यात घेतले. आरोपीने पळून जाण्याचा प्रयत्न केल्याने सौम्य बळाचा वापर करून आरोपीस ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपीवर औरंगाबाद, अयोध्या (उत्तरप्रदेश), जबलपूर (मध्यप्रदेश), गुजरात, कलकत्ता या ठिकाणी पाहिजे आरोपी असून दाखल गुन्ह्याची माहिती घेण्याचे काम पोलीस करत आहे.

## उरण ते नवी मुंबई बेस्ट बससेवा सुरू

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

उरणमधून मुंबई कुलाबा, नवी मुंबई जाण्यासाठी मुंबई महानगरपालिका परिवहन सेवेची बेस्ट सेवा सुरू करण्यात यावी अशी अनेक वर्षांपासूनची नागरिकांची मागणी होती. ती मागणी आता पूर्ण झाली आहे नागरिकांनी उरण ते मुंबई, उरण ते नवी मुंबई बेस्ट बस सेवा सुरु होण्याचे स्वप्न बघितले होते. ते स्वप्न आता प्रत्यक्षात उतरले आहे.

बेस्ट प्रशासनाने उरण ते बांद्रा स्टेशन पुर्व, उरण ते अटलसेतू मार्ग मुंबई कुलाबा, उरण ते वाशी अशी बस सेवा सुरू केल्याने प्रवाशी वर्गांनी, नागरिकांनी आनंद व्यक्त केला आहे.

उरण येथून पहिल्यांदाच उरण ते नवी मुंबई, उरण ते मुंबई अशी सेवा सुरु झाली आहे. १६ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ९ वाजता भूपाळी गृह संकुल सोसायटी द्रोणागिरी सेक्टर १२ येथून पहिली व दुसरी बस मुंबई व नवी मुंबईकडे रवाना झाल्या. बस सेवा सुरू झाल्या या वेळी एकूण दोन बस आल्या होत्या.



**पनवेल : गव्हाण येथील ओम शेखर देशमुख या तरुणाने लंडनमध्ये एम.एस्सी. इंटरनॅशनल बिझनेस ही पदवी डिस्टिंक्शनसह संपादन करून शैक्षणिक क्षेत्रात भरारी घेतली आहे. ओमच्या उच्च शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत यांनी स्वीकारली होती. दरम्यान, शेलघर येथे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते ओमचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला कामगार नेते महेंद्र घरत, ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, शेखर देशमुख, गुलाबशेठ घरत आदी उपस्थित होते.**



**पनवेल : खारघरचा राजा मंडळाचे अध्यक्ष व भाजपचे नेते विजय पाटील यांच्या कन्या मीनल पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर आणि जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी विजय पाटील, माजी सरपंच विनिता पाटील, ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भगवान गायकवाड, अशोक कांबळे, सल्लागार तात्यासाहेब घाडगे, प्रदीप मात्रे, विनय पाटील, संतोष धायगुडे, किशोर श्री, रमेश हिरवी, प्रकाश आवटे, राजू पराठे, सुभाष पाटील, अशोक पाटील, संकेत पठारे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप नवीन पनवेल शहर मंडळ ओबीसी मोर्चाच्या शहर अध्यक्षपदी रामनाथ पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर व भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी अभिनंदन केले. या वेळी नवीन पनवेल शहर मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, गणेश पाटील, नवीन पनवेल शहर मंडळ महिला अध्यक्ष राजश्री वावेकर आदी उपस्थित होते. सर्वांनी रामनाथ पाटील यांचे अभिनदंन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## पनवेलमध्ये बेवारस रुग्णाला जीवदान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वैद्यकीय आरोग्य विभागाच्या संवेदनशील आणि तत्पर कार्यपद्धतीमुळे एका बेवारस जखमी रुग्णाचे प्राण वाचले. शनिवारी रात्री पनवेल बस स्थानक परिसरात एक ४० वर्षीय बेवारस पुरुष गंभीर जखमी अवस्थेत बसलेला असल्याची माहिती पनवेल प्रभागातून महापालिकेला मिळताच आरोग्य विभागाने त्वरित कारवाई केली.

वैद्यकीय पथक रुग्णवाहीकेसह घटनास्थळी दाखल झाले. तपासणीदरम्यान रुग्णाच्या तोंडाला मोठी, कुजलेली जखम असून तिच्यात आळ्या आढळून आल्या. उपजिल्हा रुग्णालयात प्रारंभिक उपचारांनंतर पुढील जटिल उपचारांसाठी त्याला जे.जे. रुग्णालय, मुंबई येथे हलविण्यास सांगण्यात आले.

प्लास्टिक सर्जन यांच्या देखरेखीखाली त्याच्यावर उपचार सुरू आहेत. या कामी वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश पंडित, रुग्णवाहीका चालक कल्पेश डुकरे व मदतनीस पवन सरकटे यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

# करंजा मच्छिमारांकडून केंद्र सरकारच्या पर्ससिन मासेमारी पद्धतीच्या निर्णयाचे स्वागत

**उरण : प्रतिनिधी**

देशाच्या एक्सकलुझिव इकॉनॉमिक्स झोन (एएन) क्षेत्रात पर्सिसीन पद्धतीने मासेमारी करण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे यापुढे मच्छिमार अधिकृत रित्या समुद्रात १२ नॉटीकलच्या पुढे मासेमारी करू शकणार आहेत. याचा फायदा मासे निर्यात वाढण्यात होणार आहे. केंद्र सरकारच्या या निर्णयाचे करंजा येथील मच्छिमारांनी स्वागत केले असून केंद्र व राज्य सरकारचे आभार मानले आहेत. आजपर्यंत या क्षेत्रात परदेशांतील तसेच इतर राज्यांतील बोटी एलईडी पद्धतीने मासेमारी करीत होत्या. त्यामुळे राज्यातील मच्छिमारांचे नुकसान होत होते. हे थांबवून राज्यातील मच्छिमारांना या स्पर्धेत टिकवायच असल्यास राज्य सरकारने पर्सिसीन पद्धतीच्या मासेमारीला परवानगी देण्याची मागणी अनेक मच्छिमार संघटनांनी राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे यांच्याकडे केली होती.



केंद्र सरकारची अधिकृत परवानगी नसल्याने राज्यातील बोटी पर्ससीन पद्धतीने मासेमारी करणाऱ्या बोटींवर कारवाई केली जात होती, मात्र इतर राज्यांतील व इतर देशांतील बोटी त्याच पद्धतीने मासेमारी करून आपली मासळी घेऊन जातात व त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नव्हती. ही स्थिती अत्यंत अन्यायकारक होती. त्यामुळे जर पर्ससीन मासेमारीलाही तातडीने कायदेशीर परवानगी दिली, तर महाराष्ट्राचे मासळी उत्पादन दहा पटीने वाढणार आहे.

ज्यांनी एनसीडसी योजनेंतर्गत कर्ज घेऊन पर्ससीन नेट मासेमारीसाठी बोटी बांधल्या, त्या वेळी या बोटींना पर्ससीन नेट मासेमारी करण्यासाठी परवानेही महाराष्ट्र शासनाकडून मिळाली होती. ते मूळ पर्ससीन नेट करणारे मच्छीमार पूर्णपणे आर्थिक दृष्ट्या नुकसानात आले आहेत. आजही त्या मच्छीमारांवर आणि त्यांच्या सोसायट्यांवर कोट्यवधी रुपयांचे कर्ज आहे. पर्ससीन नेट वाढू नये म्हणून जवळपास ४०० बोटींना गेली दहा वर्षे राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (NCDC) योजनेंतर्गत कोणतेही आर्थिक साहाय्य मिळालेले नाही. मच्छीमार कर्जात अडकले आणि दहा वर्षे पर्ससीन नेट मच्छीमारांवर कारवाई होत राहिली. पर्ससीन नेट आधुनिक मच्छीमारांच्या एका पिढी व्यवसायापासून वंचित झाली आहे. पर्ससीन नेटसोबत पारंपारिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांनादेखील खलाशी मिळत नाहीत. त्यांना बोटीवर जाण्यासाठी इतर राज्यांतून लोकांना मागवावे लागत आहेत.

पर्ससीन नेट मासेमारीला परवानगी मिळाल्यामुळे ही मासेमारी अधिकृत होईल. याचा फायदा निर्यात वाढीला आणि आंतरराष्ट्रीय बाजारात मासळीला दर मिळण्यासाठी होणार आहे. यासाठी सहकार्य करणाऱ्या केंद्र राज्य आणि स्थानिक आमदार महेश बालदी यांचे आभार मानण्यात आले आहेत.

केंद्र सरकारच्या अधिसूचनेनुसार पर्सिसीन पध्दतीने मासेमारी करणाऱ्या बोटींचे विहीत नमुन्यात अर्ज करावेत असेही आवाहन मच्छिमार कार्यकर्त्यांनी केले आहे.

**ईईझेड म्हणजे काय?**

ईईझेडचा अर्थ अनन्य आर्थिक क्षेत्र (Exclusive Economic Zone) असा होतो. हा समुद्रामधील एक असा विभाग आहे, जो देशाच्या भूमी किनाऱ्यापासून २०० समुद्री मैल (सुमारे ३७० किमी) पर्यंत पसरलेला असतो. या क्षेत्रात, त्या देशाचा नैसर्गिक संसाधने, जसे की मासे आणि तेल, शोधणे, त्यांचे उत्पादन करणे आणि त्यांचा वापर करण्याचे विशेष अधिकार असतात.

## संपादकीय

# एनडीएचे ऐतिहासिक यश

बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीने ऐतिहासिक विजय संपादन करून फिर एक बार एनडीए सरकार हा नारा बुलंद केला आहे. एक्झिट पोल्सनी वर्तविलेल्या अंदाजाच्याही पुढे जात भाजप, जेडीयू, एलजेपी व मित्र पक्षांच्या युतीने एकूण २४३पैकी दोनशेपार जागा जिंकल्या, तर काँग्रेस, राजद व सहकाऱ्यांच्या विरोधी महाआघाडीला अर्धशतकही गाठता आले नाही. यावरून जनमत सहज लक्षात येते.

**बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएने अभूतपूर्व विजय मिळविला आहे. साधारण दोन तृतीयांश जास्त जागा एनडीएच्या नियंत्रणात आल्या हे त्यांच्या बहुमताचे मुर्तरूप आहे. दुसरीकडे विरोधकांचा हा पराभव म्हणजे केवळ भाजप आणि जदयूच्या यशाचा नाही, तर हा विरोधी पक्षांसाठी एक गंभीर संदेश आहे. विशेषतः राहुल गांधींचे काँग्रेस आणि तेजस्वी यादवांची महाआघाडी या यंत्रणेतील कमजोर नेतृत्व आणि दिशा-संकल्पना व्यक्त करून जातात. मतदारांनी एनडीएच्या विकास आणि सुशासनावर विश्वास दर्शविला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या नेतृत्वाखाली लोकांना असा विश्वास वाटतो की, बिहारमध्ये स्थिरता आणि कामाचा दृष्टिकोन कायम राहील. काही विश्लेषणांनुसार महिलांमध्ये मतदानाचे प्रमाण खूप जास्त होते आणि त्यांच्या गरजा, रोजगारी, सुरक्षितता, समाजसेवा हे मुद्दे एनडीएच्या रणनीतीमध्ये प्रभावीपणे होते. महाआघाडीने उच्च वादग्रस्त वायदे केले होते-जसे की सर्वांना सरकारी नोकऱ्या, जुनी पेन्शन स्कीम परत आणणे इत्यादी, पण याची व्यवहार्यता कमी दिसली. शिवाय काँग्रेस, आरजेडी व मित्रपक्षांमध्ये जागावाटप आणि प्रचारात समन्वयाचा अभाव होता. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी नेहमीप्रमाणे मतचोरीचा आरोप केला, मात्र या मोहिमेला भू-स्तरीय मतदारांमध्ये फार प्रतिध्वनी मिळाला नाही. भाजप आणि एनडीए नेतृत्वाने हे आरोप निराधार म्हणून खंडित केले. दरम्यान, काँग्रेसमध्ये राहुल गांधी यांच्या नेतृत्वावर तक्रारी वाढल्या आहेत. अनेकांनी त्यांच्या रणनीती, अजागतिक दृष्टिकोन व सातत्यहीन अभियान याबद्दल नाराजी व्यक्त केली आहे. त्याचबरोबर आरजेडीचे तेजस्वी यादवदेखील मुख्य चेहरा म्हणून उठून येत नाही, असे अनेक तज्ज्ञ सांगतात. त्यांच्या कॅम्पेनमध्ये व्यापक जनसमर्थन मिळवण्यात अडचणी आल्या आहेत. राहुल गांधी यांच्या घोषणांनी आणि आक्रमक शैलीने काही वाद निर्माण केले, परंतु त्यांच्या मतचोरी आरोपांना वास्तविक जमिनीवर तोडगा मिळाला नसल्याचे दिसले आहे. त्यांचा विजयाचा इतिहासही प्रश्नाखाली आहे. हा सततचा पराभव आणि आरोप-प्रतिकार यांचा खेळ, त्यांच्या पक्षाचे विशेषतः बिहारसारख्या महत्त्वाच्या राजकीय भूभागात भविष्य धोक्यात आणू शकतो. तेजस्वी यादव हेही महाआघाडी अपेक्षित गती पकडू शकले नाही. एकूणच विरोधकांची धुळधाण उडाली. या निकालाचा परिणाम महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्येही पहायला नाही मिळाला तरच नवल. राज्यातील विरोधी पक्षांच्या महाविकास आघाडीत फूट पडली आहे. काँग्रेसने मुंबई महापालिका निवडणुकीत 'एकला चलो रे'चा सूर आळवला आहे. ठाकरे बंधूंमधील जवळीक वाढत असताना विशेषतः मनसेची हाणामारी संस्कृती पटत नसल्याने काँग्रेसने स्वतंत्रपणे लढण्याचे ठरवले आहे. बिहारमध्ये भाजपप्रणित एनडीएने निर्विवाद वर्चस्व मिळवले असून सत्ताधाऱ्यांचा उत्साह सर्वत्र वाढला आहे. अशात काँग्रेसचा निर्णय भाजप महायुतीच्या पथ्यावर पडणारा आहे.**

# श्री गुरू तेग बहादुर- 'हिंद दी चादर'

श्री गुरू तेग बहादुर (एप्रिल १६२१-नोव्हेंबर १६७५) हे शीख धर्माचे नववे गुरू होते. त्यांचा जन्म अमृतसर (पंजाब) येथे झाला. श्री गुरू तेग बहादुर यांनी आपल्या आयुष्यात अन्याय, धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा दिला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या नावाने गौरविले जात. धर्म, मानवता, आदर्श आणि तत्त्वांच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्यांमध्ये गुरू तेग बहादुर यांचे स्थान जागतिक इतिहासात अद्वितीय आहे.



श्री गुरू तेग बहादुर हे जगभर प्रभाव टाकणारे महान गुरू मानले जातात. त्यांच्या शहिदी समागमाचा इतिहास सर्वदूर पोहचावा यासाठी गुरू तेग बहादुर यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्त महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभाग व श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने राज्यभर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

एप्रिल १६२१मध्ये अमृतसरमध्ये श्री गुरू तेग बहादूर यांचा जन्म वडील गुरू हरगोबिंद आणि माता गुजरी यांच्या कुटुंबात झाला. १६६४मध्ये त्यांना गुरू ही पदवी प्राप्त झाली तर त्यांचे पुत्र गुरू गोविंदसिंह यांनाही गुरू पदवी प्राप्त झाली होती. गुरू तेग बहादूर यांचे मूळ नाव त्यागमल होते. बालपणी एका युद्धात त्यांनी अतुलनीय शौर्य दाखवले त्या वेळी त्यांच्या वडिलांनी त्यांना तेग बहादूर म्हणजेच तलवारीसारखा धैर्यवान हे नाव दिले. ते अतिशय शांत, ध्यानशील आणि संयमी स्वभावाचे होते. त्यांनी मोठे भाग्य, संपत्ती, मान नाकारत आनंदपूर साहिब येथे ध्यान आणि सेवा यांमध्ये आयुष्य व्यतीत केले. धार्मिक असहिष्णुता आणि अत्याचाराविरोधात लढा देत असताना त्यांना दिल्लीतील चांदणी चौकातील तुरूंगात ठेवण्यात आले होते. तेथे त्यांनी ध्यान करत ईश्वराचे स्मरण करण्यास प्राधान्य दिले.

मानवधिकारांच्या सुरक्षेसाठी काम करीत असताना गुरू तेग बहादुर शहीद झाले. त्यांनी लोकांना सत्य, संयम, करूणा आणि धैर्य या मुल्यांचा संदेश दिला. त्यांची अनेक भक्तिगीते गुरू ग्रंथ साहिबमध्ये समाविष्ट आहेत. त्यांनी आनंदपूर साहिब हे पवित्र स्थळ स्थापन केले. जे आजही शीख धर्मातील अत्यंत महत्वाचे तीर्थस्थान मानले जाते. त्यांच्या बलिदानामुळे ते धार्मिक स्वातंत्र्याचे प्रतीक बनले होते. त्यांच्या स्मरणार्थ त्यांची जयंती देशभरात श्रद्धेने साजरी केली जाते. केंद्र शासनाने २०२२मध्ये त्यांची ४००वी जयंती देशभर साजरी केली होती.

गुरू तेग बहादुर यांनी देशाला साधे आणि गहन तत्वज्ञान दिले व सुमारे ५७ शबद (भक्तिगीते) आणि ५७ सलोक (उपदेशपर पदे) रचले. या रचनांमध्ये वैराग्य, सत्य, मृत्यूचे चिंतन, आत्मज्ञान आणि परमेश्वरावर श्रद्धा या भावना प्रबळ आहेत. त्यांच्या सर्व रचना गुरु ग्रंथ साहिबच्या शेवटच्या भागात आहेत.

'जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै,
सुख सनेहु अरू भय नहीं जा कै, कांचन
माटी मानै, लोभ मोह अभिमान न ता कै,
हरख सोग नहीं जा कै
जो नर दु:ख में दु:ख नहीं मानै'

म्हणजेच जो मनुष्य दु:खात असला तरी दु:खी होत नाही, जो सुखात असला तरी अहंकार करत नाही, ज्याच्यासाठी सोने आणि माती समान आहेत, जो लोभ, मोह, अभिमान, आनंद आणि शोक यांपासून मुक्त आहे तोच खरा ज्ञानी आहे. अशा अनेक भावपूर्ण आणि मानवी जीवनाचा सार सांगणाऱ्या रचना त्यांनी केल्या आहेत.

गुरू तेग बहादुर यांच्या शहीद समागमास ३५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त अल्पसंख्याक विभाग आणि श्री गुरूतेग बहादुर साहिब जी ३५० शहीदी समागम राज्यस्तरीय समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नुकत्याच या कार्यक्रमांच्या आयोजनानिमित्त कार्यशाळा घेण्यात आली होती. या वेळी 'हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादुर साहेब' यांच्या ३५०व्या शहिदी समागमनिमित्त संकेतस्थळाचे आणि गुरू तेग बहादूर यांच्या बलिदानाचा इतिहास सांगणाऱ्या गीताचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यशाळेनिमित्त शीख, सिकलिगर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी हे सहा समाज एकत्र आले होते आणि हा कार्यक्रम जनमानसांपर्यंत पोहचविण्यासाठी समिती आणि शासन एकत्रितरित्या काम करीत आहे.

गुरू तेग बहादुर यांच्या बलिदानाचा इतिहास राज्यातील प्रत्येक घरात पोहोचविणे ही सामूहिक जबाबदारी आहे तसेच तहसील, शहर, जिल्हा व क्षेत्रीय समितीच्या माध्यमातून प्रत्येक गावात आणि घराघरात गुरू तेग बहादुरांच्या हौतात्म्याचा इतिहास पोहचविला जाणार आहे.

**-श्रद्धा मेश्राम,** विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय

# आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन

'आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन' हा जगभरातील परदेशात शिक्षण घेणार्या विद्यार्थी समुदायाचा जागतिक उत्सव मानला जातो. परदेशात आंतरराष्ट्रीय विद्यार्थी असणे हे एक आव्हान आहे. आपले कुटुंब आणि घर मागे सोडण्यासाठी धैर्य लागते. त्यांचे जीवन सुधारण्यासाठी आणि त्यांच्या कुटुंबांना आधार देण्यासाठी, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी हे विद्यार्थी मायदेशातून लांबचा प्रवास करतात.

सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठ जीवन आव्हानात्मक वाटते, परंतु परदेशी विद्यार्थ्यांना अतिरिक्त अडचणींचा सामना करावा लागतो हे नाकारता येणार नाही. यामध्ये भाषेची आव्हाने, सांस्कृतिक फरक, आर्थिक अडचणी अशा अनेक गोष्टींचा समावेश असतो. मात्र, त्यांना स्वतःच समस्या सोडवून त्याचे शिक्षण पूर्ण करावे लागते.

आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन, परदेशातील विद्यार्थ्यांना संघर्षासाठी पाठिंबा आणि त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा मानला जातो. दरवर्षी, १७ नोव्हेंबरला रोजी जगभरात साजरा केला जातो. प्रत्येकाने हा दिवस साजरा करून आंतरराष्ट्रीय विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रवासात स्वत:चे सुरक्षित भविष्य घडवण्यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.

१९३९ मध्ये प्रागमधील एका विद्यापीठावर नाझींनी केलेल्या हल्ल्याचा दिवस आहे. नाझींनी सुमारे एक हजार विद्यार्थ्यांना कैद केले, विद्यापीठ बंद केले आणि अनेकांना ठार केले. अनेक विद्यार्थ्यांवर अत्याचार केला. प्राग विद्यापीठातील १२०० हून अधिक विद्यार्थ्यांचा सन्मानार्थ आणि परदेशात शिक्षण घेणार्या विद्यार्थ्यांना येणार्या आव्हानांबद्दल जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.

नवनिर्मिती आणि सर्जनशीलता अशा वातावरणात वाढतात जिथे विविध संस्कृतीतील लोक भेटतात, कल्पनांची देवाणघेवाण करतात आणि एकमेकांकडून शिकतात. इतकेच काय, तर विविधतेची जाणीव आणि फरकांची स्वीकृतीकरून यशस्वी व्यक्ती बनण्यासाठी आवश्यक आहे अश गोष्टी ज्ञात करून आणि विविध समस्या सोडवू नवीन मार्ग शोधण्यासाठी विद्यार्थ्यांना बळ मिळते. म्हणून, आपण आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन साजरा करतो.

शिवाय, आपल्या जीवनातील प्रत्येक दिवस, हे विद्यार्थी विविध संस्कृती आणि पार्श्वभूमीतील लोकांशी संवाद साधतात. त्यामुळे, हे परस्परसंवाद इतर लोकांबद्दल सहानुभूती आणि समज विकसित करण्यास देखील मदत करतात.

ज्या ठिकाणी विविध संस्कृतीतील लोक भेटतात आणि त्यांच्या परंपरांबद्दल बोलतात अशा ठिकाणी नाविन्य आणि सर्जनशीलता अस्तित्वात आहे. मुलांसाठी मतभेदांची स्वीकृती महत्त्वाची आहे कारण ते त्यांना वाढण्यास आणि चांगले मानव बनण्यास मदत करते. आंतरराष्ट्रीय विद्यार्थी दिन आपल्याला याची जाणीव करून देतो की विविधता आपल्याला सहानुभूती विकसित करण्यास आणि इतरांना चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत करते. म्हणून, या दिवसाचे जगभरात महत्त्वाचे स्थान आहे.

साभार : इंटरनेट




# सेल्फीच्या नादात बँक खाते होऊ शकते रिकामे

सायबर फ्रॉडची रोज नवीन प्रकरणं समोर येत आहेत. लोकांची आयुष्यभराची कमाईही लुटली जात आहे.



सायबर गुन्हेगार नवनवीन डावपेच अवलंबत आहेत. आजकाल सेल्फी काढणं हे सामान्य झालं आहे. प्रत्येकाला आपले सुंदर फोटो सोशल मीडियावर शेअर करायचे असतात. पण तुमची ही सवय तुम्हाला मोठ्या संकटात टाकू शकते हे तुम्हाला माहीत आहे का? सायबर गुन्हेगार आता सेल्फीचा वापर करून तुमची पर्सनल आणि बँक अकाऊंटची माहिती चोरू शकतात. यानंतर सायबर अटॅक करून तुमचं बँक अकाऊंट रिकामं केलं जाऊ शकतं.

अनेक ॲप्स आणि वेबसाइट्सवर तुम्हाला तुमच्या ओळखीची पुष्टी करण्यासाठी सेल्फी घेण्यास सांगितलं जातं. याला सेल्फी ऑथेंटिकेशन म्हणतात. हे एक तंत्रज्ञान आहे जे हे सुनिश्चित करतं की, तुम्ही तीच व्यक्ती आहात ज्याची ओळख तुम्हाला सिद्ध करायची आहे. बहुतेक बँका आणि फिनटेक कंपन्या सेल्फीद्वारे लोकांचं व्हेरिफिकेशन करतात, मात्र याच तंत्राचा वापर सायबर गुन्हेगारही करू शकतात, ज्याद्वारे ते तुमचा गैरफायदा घेऊ शकतात.

बँक फ्रॉड : सायबर गुन्हेगार तुमच्या सेल्फीचा वापर करून तुमच्या बँक अकाऊंटमध्ये प्रवेश करू शकतात आणि तुमचे पैसे काढू शकतात. लोन फ्रॉड : हॅकर्स तुमच्या सेल्फीचा वापर करून तुमच्या नकळत तुमच्या नावावर कर्ज घेऊ शकतात. सिमकार्डचं क्लोनिंग : तुमच्या सेल्फीच्या मदतीने सायबर गुन्हेगार तुमचं सिमकार्ड क्लोन करू शकतात, ज्यावरून ते तुमच्या मोबाइल क्रमांकावर आलेला ओटीपी मिळवू शकतात.

असं ठेवा स्वतःला सुरक्षित

अनोळखी लिंकवर क्लिक करू नका. कोणत्याही संशयास्पद लिंक्सपासून लांब राहा. तुमच्या सर्व अकाऊंटसाठी यूनिक आणि स्ट्राँग पासवर्ड तयार करा. सुरक्षा वाढवण्यासाठी टू फॅक्टर ऑथेंटिफिकेशनचा वापर करा. चांगल्या अँटीव्हायरस सॉफ्टवेअरचा वापर करून तुमचा फोन मालवेअरपासून सुरक्षित ठेवा. सोशल मीडियावर तुमची पर्सनल माहिती शेअर करणं टाळा. तुम्ही सायबर फ्रॉडला बळी पडल्याचं तुम्हाला वाटत असल्यास, ताबडतोब तुमच्या बँकेशी संपर्क साधा. नेहमी सावध राहा आणि तुमची पर्सनल माहिती कधीही, कोणाशीही शेअर करू नका.

# 'पंजाब केसरी' लाला लजपत राय

## निमित्त



भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील प्रमुख नेत्यांपैकी एक असलेले लाला लजपत राय एक लेखक आणि राजकारणी होते आणि पंजाब नॅशनल बँक आणि लक्ष्मी नॅशनल बँकेच्या अनेक राष्ट्रवादी कार्यांशी ते जोडलेले होते.लाला लाजपत राय हे 'लाल बाल पाल' या त्रिमूर्तीचे सदस्य होते. यामध्ये पंजाबचे लाला लाजपत राय, महाराष्ट्राचे बाळ गंगाधर टिळक आणि बंगालचे बिपिनचंद्र पाल यांचा समावेश होता. स्वातंत्र्यलढ्याची दिशा बदलण्यात या तिन्ही नेत्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या तिघांनीही स्वदेशी चळवळीला बळ देण्यासाठी देशभरातील लोक एकत्र केले. लाला लाजपत राय यांचा २८ जानेवारी १८६५ रोजी पंजाबच्या लुधियाना जिल्ह्यात धुंढिके (जागराँ तहसील) या गावी जैन घराण्यात झाला. त्यांची आई (गुलाबदेवी) मूळची शीख होती. धार्मिक सहिष्णुतेच्या वातावरणात वाढत असलेल्या लजपतरायांनी मिशन हायस्कूलमधून शिक्षण घेऊन पुढे एलएल बी. ही पदवी मिळविली (१८८६) आणि अल्पकाळातच यशस्वी वकील म्हणून त्यांना मान्यता मिळाली. पुढे १८९२ साली लाहोरला स्थायिक होऊन त्यांनी तेथे वकिली सुरू केली.

१९०५ साली बंगाल चे विभाजन करण्यात आले. तेव्हा लाला लजपत राय यांनी सुरेंद्रनाथ बॅनर्जी आणि आणि बिपिनचंद्र पाल यासारख्या देशभक्तां सोबत मिळून या निर्णयाविरुद्ध आंदोलन केले. देशभरात त्यांनी स्वदेशी आंदोलन चालवले. ३ मे १९०७ ला रावलपिंडी मधून त्यांना इंग्रजांनी अटक केली आणि सहा महिने मंडाल्याच्या जेल मध्ये ठेवून ११ नोव्हेंबर १९०७ ला मुक्त करून दिले.

यानंतरच्या काळात त्यांनी इंग्रजांविरुद्ध आपले आंदोलन अधिक उग्र केले. इंग्रज त्यांच्या लोकप्रियतेला घाबरु लागले. भारताच्या या वास्तविक परिस्थितीचा प्रचार दुसऱ्या देशात करण्यासाठी ते १९१४ ला ब्रिटनमध्ये गेले. याच दरम्यान प्रथम विश्व युद्ध सुरू झाले. ज्यामुळे ते परत भारतात येऊ शकले नाहीत. इंडियन इन्फॉर्मेशन ब्युरो ची स्थापना केली, याशिवाय दुसरी संस्था होमरूल लीगची स्थापना केली.

१३ एप्रिल १९१९ रोजी झालेल्या जलियावाला बाग हत्याकांड च्या विरोधात पंजाब मध्ये प्रदर्शन व असह्योग आंदोलनाचे त्यांनी नेतृत्व केले. यादरम्यान इंग्रजांनी त्यांना बऱ्याचदा अटक देखील केली.

३० ऑक्टोबर १९२८ ला इंग्लंड चे सुप्रसिद्ध वकील सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक सात सदस्य असलेले आयोग भारतात आले. सायमन कमिशनच्या विरोधात लोक रस्त्यावर उतरून आले. लाला लजपत राय यांनी सुद्धा सायमन कमिशनच्या विरोधात एक मिरवणूक काढली. ही मिरवणूक घोषणा देत जात होती तरी यात कोणती हिंसा भारतीयांद्वारे होत नव्हती. पण इंग्रजांनी आंदोलकांवर केलेल्या लाठीचार्ज दरम्यान लाला लजपतराय यांना गंभीर दुखापत झाली, आपल्या शेवटच्या भाषणात ते म्हटले माझ्या शरीरावर लागलेला एक एक घाव ब्रिटिश साम्राज्याचा मृत्यूचे कारण असेल. पोलीसांकडून झालेल्या या लाठीचार्जमुळे १७ नोव्हेंबर १९२८ला त्यांचा मृत्यू झाला. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# आवळा खा आणि आजारांना दूर ठेवा!

आवळा म्हणजे खरंतर भारतीय आयुर्वेद आणि पाकशास्त्रच लाडकं फळ. आवळ्याचा रस, आवळ्याचा कीस, आवळ्याचे सरबत, आवळ्याचे लोणचे, पाकातील आवळा, आवळा पवार. आवळा च्यवनप्राश कोणत्याही स्वरूपात आवळा वापरता येतो आणि गुणकारी असतो.



ज्यांच्या शरीरात कोलेस्ट्रॉलचे प्रमाण जास्त असते त्यांना आवळा खाल्ल्यामुळे अत्यंत चांगले फायदे होतात. आवळ्यातील बायो-ॲक्टिव्ह कंपाऊंड ट्रायग्लिसेराईड्सचे प्रमाण कमी करतात तसेच चांगले कोलेस्ट्रॉल म्हणजे एचडीएल (चांगले कोलेस्टेरॉल)चे प्रमाण वाढवतात. लो-डेन्सिटी लिपोप्रोटीनंचे देखील प्रमाण कमी करतात. यासोबत वाढलेले कोलेस्टेरॉलचे प्रमाण कमी करण्याचे प्रमाण आवळ्यामुळे केले जाते.

आवळा हा मधुमहींसाठी अत्यंत गुणकारी आहे. आवळ्यामध्ये असणाऱ्या एलेजीक ॲसिड आणि जीवनसत्व क मुळे शरीरातील साखरेचे प्रमाण अत्यंत संतुलित प्रमाणात राहिले राखले जाते. विशेषतः अमाईलेज आणि ग्लुकोज या दोघांचे शरीरातील संतुलन राखण्यासाठी आवळा गुणकारी आहे.

मधुमेह असणाऱ्यांसाठी आवळ्याचा रस किंवा आवळ्याचा अर्क हा शरीरातील ग्लुकोज आणि ट्रायग्लिसेराईडचे प्रमाण कमी करण्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे. ज्यांचे सिरम इन्सुलिन वाढलेले असते त्यांच्यासाठी आवळ्याचा रस अत्यंत गुणकारी आहे आवळ्याचा रस नियमितपणे प्यायल्यामुळे शरीरातील इन्सुलिनचे प्रमाण संतुलित राखण्यास मदत होते. याव्यतिरिक्त आवळा हा अत्यंत उपयुक्त फळ आहे. आवळ्यामुळे शरीरातील पेशींचे आरोग्य सुधारते तसेच पेशींचे आवरणदेखील अत्यंत तंदुरुस्त होऊन जाते.

ज्यांना श्वसनाचे विकार आहेत किंवा ज्यांना हृदयरोग आहेत त्यांना आरोग्य सुधारण्यासाठी आवळ्यासारखे फळ नाही. शरीरामध्ये जर कोणत्याही प्रकारच्या आम्लांचे असंतुलन असेल तर आवळा अत्यंत गुणकारी आहे. वजन कमी करण्याच्या अनेक औषधांमध्ये आवळ्याचा अर्क वापरला जातो. लहान मुलांचे पचन स्वास्थ्य वाढविण्यासाठी रोज एक चमचा आवळा खाण्यात असायला हवा. आवळा नियमित खाल्ल्यामुळे उत्तम फरक दिसून येतो.

# खालापुरात कंपनीतील रसायनाच्या वासामुळे महिला कामगार अस्वस्थ

**खोपोली ; प्रतिनिधी**

रसायनाचे अतिरिक्त प्रमाण झाल्याने होराळे येथील सौंदर्यप्रसाधन तयार करणाऱ्या केन कॉस्मेटिक प्रायव्हेट लिमिटेड कारखान्यात आठ महिला कामगारांना चक्कर आणि अस्वस्थ वाटू लागल्याने दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. सर्व महिला कामगारांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळाली आहे.




खालापूर तालुक्यात होराळे ग्रामपंचायत हद्दीत केन कॉस्मेटिक प्रायव्हेट लिमिटेड कारखाना आहे. या ठिकाणी स्थानिक महिला कामगार काम करत असून कामाच्या ठिकाणी आठ महिला कामगारांना अस्वस्थ तसेच श्वास घेण्यास त्रास जाणू लागल्याने तातडीने खोपोली येथील रुग्णालयात उपचार करता दाखल करण्यात आले. सध्या उपचार घेत असलेल्या सर्व महिला कामगारांची प्रकृती स्थिर असून होराळे ग्रामपंचायतीने कारखान्याला उपाययोजना करण्याबाबत लेखी नोटीस दिली आहे.

कारखान्यात नेहमीच्या कार्यपद्धतीत सॅनिटायझर सारख्या रसायनाचे प्रमाण जास्त झाल्याने त्याचा त्रास महिला कामगारांना झाला. उग्र वासामुळे त्रास जाणवू लागल्याने तातडीने रुग्णालयात दाखल केले.कामगगरांच्या सुरक्षितता बाबत आम्ही कायम प्राधान्य दिले आहे असे केनचे आनंद पांडे यांनी सांगितले.

> **कामगारांची सुरक्षितता महत्त्वाची आहे. याबाबत ठेकेदाराने देखील कामगारांना योग्य ती सुरक्षेची साधने पुरवणे आवश्यक असून त्याबाबत ठेकेदाराची उदासीनता दिसून येते.**
> **–श्रीकांत भोईर, ग्रामस्थ होराळे गाव**

# रोह्याचा शुभम दिवेकर 'मिस्टर रायगड २०२५'



**पेण : प्रतिनिधी**

पेण नगर परिषदेच्या मैदानावर स्वररंगतर्फे भरविण्यात आलेल्या पेण फेस्टिवलमध्ये जल्लोषपूर्ण वातावरणात मिस्टर रायगड २०२५ ही सौंदर्य स्पर्धा झाली. या स्पर्धेत रोह्याचा शुभम सतीश दिवेकर हा मिस्टर रायगड २०२५ किताबाचा मानकरी ठरला.

अलिबाग येथील संजोग पाटील याने द्वितीय, पेणमधील तन्मय गावंड याने तृतीय क्रमांक पटकावला. स्पर्धेत राज्यातील १९ स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. बेस्ट कॉस्च्युम आशुतोष मनोहर कांबळे (बदलापूर), बेस्ट हेअर साहिल निलेश तलाठी (महाड), बेस्ट स्माईल भावेश चिले (खोपोली), बेस्ट पर्सनॅलिटी चंद्रमा रामचंद्र (दिघा), बेस्ट फोटोजनिक खेळाडू अथर्व विजय सरके (अलिबाग) ठरला.

स्पर्धेचे परीक्षण पत्रकार कमलेश ठाकूर, विजय मोकल, यशश्री सुरावकर, करिष्मा मोकल यांनी केले, तर कोरियोग्राफीचे काम जयेश पाटील (अलिबाग) यांनी पाहिले. मिस्टर रायगडच्या सर्व विजेत्यांना स्वररंगचे अध्यक्ष प्रा.राजेंद्र साळवी, खजिनदार भारती साळवी, उपाध्यक्ष सुनिल पाटील, सचिव कौस्तुभ भिडे, अनिकेत साळवी, निशा साळवी, अक्षता सावंत, सारिका पाटील आदी मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. सूत्रसंचालन सुभाष टेंबे यांनी केले. या स्पर्धेला रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळाली.

# धेरंड–शहापूर एमआयडीसी पोहोच रस्ता कामाला सुरुवात

## शेतकऱ्यांचा विरोध; ५० जण पोलिसांच्या ताब्यात

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील धेरंड–शहापूर येथील एमआयडीसी पोहोच रस्त्याच्या भरावाच्या कामाला शनिवारी (दि. १५ ) पोलीस बंदोबस्तात सुरुवात करण्यात आली. या कामाला विरोध करण्यासाठी आलेल्या सुमारे ५० शेतकऱ्यांना पोलींसानी ताब्यात घेतले.

सीनारमास कंपनीने पोहच रस्त्यासाठी एमआयडीच्या अधिकाऱ्यांसह महसूल अधिकारी शुक्रवारी आले होते. अचानक भरावाचे काम सुरु केल्यामुळे त्यांच्याविरोधात शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली. अन्य मागण्या पूर्ण करा, तरच पुढील कार्यवाही करा अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली. एमआयडीसीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत मुख्यालयात शुक्रवारी (दि.२१) बैठक आयोजित करून प्रश्न मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतरच शेतकरी शांत झाले.

धेरंड–शहापूर परिसरात सीनारमास प्रकल्प येत आहे. सुमारे ३८७ हेक्टर जागेमध्ये हा प्रकल्प उभा राहणार आहे. या प्रकल्पापर्यंत जाण्यासाठी सुमारे तीस हेक्टर जमीन संपादित केली जाणार आहे. सर्व्हे नं. २६४ , २६५ मधील औद्योगिक क्षेत्राच्या पोहोच रस्ता करण्यात येणार आहे. पुढील चर्चा होईपर्यंत सीमांकनाव्यतिरिक्त या रस्त्यात काहीही करू नये अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

शेतकऱ्यांचा विरोध डावलून शनिवारी सकाळी पोलीस फौजफाट्यासह अधिकारी व कर्मचारी शहापूर येथे आले. त्यांनी सीमांकन केलेल्या जागेत भराव टाकण्याचे काम सुरु केले. या कामास शेतकऱ्यांनी विरोध केला. विरोध करणाऱ्या सुमारे ५० शेतकऱ्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले.

# रायगड मेडिकल असोसिएशनची महाड येथे झोनल वैद्यकीय परिषद

**महाड ; रामप्रहर वृत्त**

रायगड मेडिकल असोसिएशन व महाड डॉक्टर्स असोसिएशनतर्फे सातवी झोनल वैद्यकीय परिषद महाड येथे यशस्वीरीत्या संपन्न झाली रायगड मेडिकल असोसिएशन आणि डॉक्टर्स असोसिएशन ऑफ महाड यांच्या संयुक्त विद्यमाने तथा वालावलकर रुग्णालय, डेरवण– चिपळूण यांच्या सहकार्याने आयोजित सातव्या झोनल वैद्यकीय परिषदेचे उद्घाटन रायगड मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. आशुतोष कुलकर्णी यांच्या हस्ते हॉटेल विसावा, महाड येथे करण्यात आले.




या उद्घाटन प्रसंगी त्यांच्यासोबत डॉक्टर असोसिएशन महाड चे अध्यक्ष डॉ. नितीन देशमुख,वालावलकर हॉस्पिटलचे रेडिओलॉजिस्ट डॉ. नेताजी पाटील, रायगड मेडिकल असोसिएशनचे चे सचिव डॉ. प्रशांत गांगल, , क्रीडा सचिव डॉ. निलेश म्हात्रे, हे उपस्थित होते या कार्यक्रमास मान्यवरांच्या उपस्थितीने विशेष उठाव मिळाला. त्यामध्ये माजी अध्यक्ष डॉ. शेखर दाभाडकर, डॉ. राजेंद्र पाटील, कार्यकारिणी सदस्य डॉ. राजेश शिंदे, डॉ. सुकाळे, डॉ. सचिन बुटाला, तसेच महाड, म्हसळा, तळा, माणगाव येथील डॉक्टर मोठ्या संख्येने उपस्थित होत

डॉ. आशुतोष कुलकर्णी यांनी बोलताना ,वालावलकर रुग्णालय, डेरवण व त्यांच्या संस्थेच्या भव्यदिव्य समाजकार्याचे आणि तळागाळातील ग्रामीण समाजाला आरोग्यसेवा देण्याचे कौतुक केले, तसेच रायगड जिल्ह्यातील डॉक्टरांच्या १० जानेवारी २०२६ ला कर्जत ला होणाऱ्या भव्य वैद्यकीय परिषदेत सहभागी होण्याचे आवाहन केले.ग्रामीण भारतातील वैद्यकीय समस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन हा या परिषदेत चे मुख्य विषय होता. या कार्यक्रमामुळे ग्रामीण वैद्यकीय कार्यात ज्ञानाची देवाणघेवाण, सहकार्य आणि शैक्षणिक गुणवत्तेला मोठी चालना मिळाली जे रायगड मेडिकल असोसिएशन आणि डॉक्टर असोसिएशन महाड चे मुख्य ध्येय आहे. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ सपना कुडतरकर यांनी केले.

# तांबटी ठाकूरवाडी अंगणवाडी व प्राथमिक शाळेत बाल दिन साजरा

**खोपोली : प्रतिनिधी**

भारताचे माजी पंतप्रधान जवाहरलाल चाचा नेहरू यांच्या १४ नोव्हेंबर रोजी जन्मदिनानिम्मित साजरा करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय बाल दिनाचे औचित्य साधून नागरी सामाजिक विकास संस्थेच्या वतीने तांबटी ग्रामपंचायत मधील ठाकूरवाडी तील अंगणवाडी व तांबटी गावातील प्राथमिक शाळेतील बालकांना खाऊ वाटप करून चाचा नेहरू यांच्या जन्मदिनानिमित्त केक कापून बालकांना केक चे वाटप करण्यात आले.

अंगणवाडी व रायगड जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत बालदिन उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला. या विशेष उपक्रमात लहान मुलांसाठी विविध आकर्षक भेटवस्तूंचे वाटप करण्यात आले तसेच मुलांसोबत केक कापून बालदिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमास नागरी सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा वर्षा राजेश मोरे यांच्या सह ग्रामपंचायत अधिकारी , प्राथमिक शाळेचे शिक्षक,व उपस्थित होते



# भाजप नेते विनोद भोईर यांचा वाढदिवस अनाथ मुले आणि वृद्धांच्या सानिध्यात साजरा

**चौक : प्रतिनिधी**

अनाथ मुलांना ब्लँकेट, स्वीट वाटून आणि वृद्धांच्या सानिध्यात भाजप नेते विनोद भोईर यांनी आज आपला वाढदिवस साजरा केला.

वडगांव पंचायत समिती प्रभागाचे भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष विनोद भोईर यांनी आपला वाढदिवस साधेपणाने साजरा केला. कर्जत तालुक्यातील जांभिवली (गौरकामत) येथील वनवासी कल्याण आश्रमात वास्तव्य करीत असलेली अनाथ मुले यांना थंडी पासून संरक्षण होण्यासाठी ब्लँकेट वाटप करून मिष्ठान्न दिले. यापुढे अनाथ आश्रम येथील विद्यार्थ्यांना व आश्रम इमारतीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी अनाथ मुलांच्या हातून केक कापण्यात आला.अनाथ मुलांनी विनोद भोईर यांना शुभेच्छा दिल्या.



दिवसभर विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले असून वयोवृद्ध यांच्या सानिध्यात काही वेळ घालवून त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या, आणि सामुदायिक भोजन केले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे खालापूर वैद्यकीय अध्यक्ष विजय ठोसर यांनी प्रास्ताविक करून कार्यक्रमाची रुपरेषा सांगून भविष्यात मदत केली जाईल असे विनोद भोईर यांच्या कडून सांगण्यात आले.आश्रम शाळेचे व्यवस्थापक व शिक्षक चौधरी यांनी आश्रमाची माहिती दिली, आश्रम शाळेला जमीनदान करणारे गुरव कुटुंबाचा गौरव करण्यात आला.कार्यक्रमास अभिजीत देशमुख, सुमित ठोंबरे, चैतन्य कुंभार, गिरीश जोशी, दत्ता कोळी, निमिष दबके यांच्या बरोबर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाड शहर किराणा व्यापारी संघाच्या अध्यक्षपदी गणेश जंगम

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहर किराणा व्यापारी संघाची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच अत्यंत उत्साहात पार पडली. सर्व व्यापारी बांधवांच्या उपस्थितीत झालेल्या या सभेत सन २०२५ ते २०२७ या कालावधीसाठी संघाची नवनिर्वाचित कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

संघाच्या पुढील दोन वर्षांच्या कारभारासाठी निवडलेल्या नवीन कार्यकारिणीवर व्यापारी बांधवांनी विश्वास व्यक्त केला आहे. नवनिर्वाचित कार्यकारिणीच्या सन २०२५ ते २०२७ या कालावधीत अध्यक्षपदी गणेश जगदीश जंगम, उपाध्यक्षपदी राकेश शेठ आणि किसन कुमावत तर सचिवपदी सेऊल शेठ आणि खजिनदारपदी स्वप्नील मुंदडा (सी.ए.) यांची निवड करण्यात आली.

कार्यकारिणी सदस्य म्हणून निखिल शेठ, राकेश मेहता, महेश ओक, सिद्धेश थरवळ, दिनेश तलाठी, जयप्रसाद दोशी, पंकज मेहता, भूषण गांधी आणि विक्रांत दोशी यांची निवड झाली. तर सल्लागार मंडळात कुमारभाई मेहता, नवनीत गांधी, संजय बुटाला आणि विजय शेठ यांची निवड करण्यात आली.



# रायगड जिल्ह्यात गुलाबी थंडी, पर्यटनवाढीला चालना

**पाली : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात संपूर्ण ऑक्टोबर महिना परतीचा पाऊसच सुरु होता. परिणामी यंदा ऑक्टोबर हिटचा उकाडा जाणवलाच नाही. काही दिवसांपूर्वी परतीचा पाऊस थांबला असून जिल्ह्यात मागील दोन तीन दिवसांपासून सकाळी व रात्री गारवा पडत आहे. त्यामुळे थंडीची चाहूल लागली आहे.

जिल्ह्यात पहाटे सर्वत्र धुक्याची दुलई पसरत आहे. धुक्यामुळे वाहतूक धीम्या गतीने सुरू आहे. मात्र अल्हाददायक वातावरणाचा पर्यटक व प्रवाशी मनसोक्त आनंद लुटत आहेत. दुपारी सुद्धा वातावरणात गारवा जाणवत आहे. याशिवाय डोंगरावर विशेषतः पांढऱ्या शुभ्र व करड्या रंगांचे ढग दाटून येत आहेत. जणूकाही येथे स्वर्गच असल्याचा भास होतो. यातच आजूबाजूला पसरलेल्या गर्द हिरवाईने हा अद्भुत नजारा आणखीच बहारदार होतो. त्यामुळे येथून प्रवासी व पर्यटक सुद्धा ढग, हिरवाई, व धुक्याचा आनंद घेत आहेत.



ट्रॅकिंग व पर्यटनासाठी हे वातावरण उत्तम आहे. त्यामुळे बरेचसे ट्रेकर व पर्यटक किल्ले, डोंगर, समुद्रकिनारा आदी ठिकाणी भटकंती करत आहेत. आणि या अद्भुत निसर्गाची मज्ञा लुटतात. ताम्हाणी घाट, वरंध घाट व मोर्बे घाट येथून प्रवास करतांना ढगांची अनुभूती मिळत आहे. असंख्य पर्यटक येथे आवर्जून थांबून मज्ञा लुटत आहेत. शिवाय रायगड, सुधागड, सरसगड, मानगड, सुरगड, मृगगड, विश्रामगड, कर्नाळा, आदींसह जिल्ह्यातील इतरही उंचावरील किल्ल्यांवर ढग व धुके पसरलेले असते. त्यामुळे येथे येणारे दुर्गप्रेमी व ट्रेकर्स दुर्गभ्रमंती बरोबरच ढगांची व धुक्याची अनुभूती घेतात. ताजे व प्रफुल्लीत करणारे हे वातावरण सर्वांनाच आकृष्ट करत आहे. त्यामुळे जिल्ह्यात पर्यटन वृद्धि सुद्धा होतांना दिसत आहे.

> **जिल्ह्यातील पाणवठे, नदी आणि छोटे–मोठे धबधबे अजूनही पाण्याच्या प्रवाहाने वाहत आहेत. त्यामुळे येथील वातावरण अतिशय नयनरम्य आहे. अनेक पर्यटक व ट्रेकर खास येथील पाणी, ढग व धुक्याचा आस्वाद घेण्यासाठी येत आहेत. खळकळणारे वाहते शुभ्र पाणी, धुक्याची व ढगांची चादर सर्वांचे लक्ष वेधून घेते. अनेकजण येथील प्राणीपक्षी व निसर्ग सौन्दर्याचा आनंद लुटत आहेत.**
> **–शंतनू कुवेसकर, निसर्ग प्राणी पक्षी अभ्यासक, माणगाव**

जिल्ह्यातून मुंबई–गोवा तसेच मुंबई–बैंगलोर हे दोन महत्वाचे महामार्ग जातात. तसेच मुंबई–पुणे द्रुतगती मार्गसुद्धा जातो. या बरोबरच मुख्य शहरांना व गावांना जोडणारे अनेक राज्य महामार्ग व राज्य मार्ग देखिल आहेत. सध्या पडत असलेले दाट धुके आणि धुरके यामुळे या मार्गांवर वाहतूक धीम्या गतीने सुरु आहे. धुक्यामुळे जिल्ह्यातील वातावरण खुप अल्हाददायक झाले आहे. त्यामुळे स्थानिक प्रवासी, पर्यटक या धुक्याचा मनमुराद आनंद लुटत आहेत. सकाळी धुक्यातुन फिरण्यासाठी निघालेल्यांना देखिल धुक्याची दुलई मोहित करत आहे. डोंगरावर पसरलेले ढग व धुक्यामुळे जिल्ह्यातील वातावरण खुप अल्हाददायक झाले आहे. पहाटे व सकाळी आवर्जून या ढगांचा आणि येथील निसर्ग सौन्दर्याचा मनमुराद आनंद लुटत आहेत. विशेषतः ताम्हिणी घाटात उतरलेले ढग दिसतात

जिल्ह्यात काही ठिकाणी तापमाना उतरताना दिसत आहे. साधारण २४ ते २७ अंश सेल्सिअस इतके तापमान पहाटे व रात्री आहे. त्यामुळे अनेकजण आवर्जून शेकोट्या पेटवताना दिसत आहेत.



## जाहिर नोटीस

सर्व संबंधीतास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिलांनी खालील वर्णनाची मिळकतीबाबत खरेदीचा व्यवहार तीचे मालक १) श्री अरूण शांताराम पाटील, २) श्री विजय शांताराम पाटील. ३) श्री मेघश्याम शांताराम पाटील व ४) श्रीमती सुहासिनी नंदकुमार नागवेकर, रा. अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड यांचेबरोबर ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे– अरिवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील**
**खालील जमीन मिळकत**

| गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर. चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|
| १३५/१ | ०.१५.९० | २.२५ |
| १३७ | ०.५९.९० | १०.०६ |

वरील मिळकतीशी अथवा तिच्या कोणत्याही भागाबाबत कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, कुळ, वहीवाट, ताबा, कब्जा, इजमेंट, साठेकरार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध, निर्दोश व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून व कोणत्याही इसमाचे हक्क असल्यास ते सोडून दिले आहेत असे समजले जाईल आणि आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, मुदतीनंतर येणा–या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी

**नवी मुंबई**
**दिनांक १४/११/२०२५**

**सही/–**
**ॲड. नवीन वि. धोंगडी**
**पत्र व्यवहाराचा पत्ता– फ्लॅट नंबर डी–४०१, ग्रिनस्केप रॉयल को. ऑप. ही.सी., प्लॉट नं. २५, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई–४१०२०९–**
**मो.क. ९००४०८७८७३**

## निवडक

### विवाहितेची आत्महत्या, दोघांवर गुन्हा

**पनवेल :** विवाहितेने आत्महत्या केल्याप्रकरणी पती गिरीश वत्स आणि सासू सुमन सुभद्रा कुवर यांच्याविरोधात खारघर पोलीस ठाण्यात १३ नोव्हेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. पुनम सिंग यांचे लग्न एप्रिल २०२५ मध्ये गिरीश वत्स यांच्याशी चंद्रपूर येथे झाले. ते खारघर सेक्टर ३५ जी येथे राहण्यासाठी आले, मात्र त्यांच्यात भांडण होत होती. बाहेरून पैसे आणण्यासाठी तिच्या मागे तगादा लावत होते. आणि तिला मानसिक त्रास देत होते. त्यामुळे पाच नोव्हेंबर रोजी लोखंडी हुकाला गळफास घेऊन पुनम हिने आत्महत्या केली. या प्रकरणी दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

### महिलांचा शिवसेनेत प्रवेश



**पनवेल :** कळंबोली येथे झालेल्या कार्यक्रमात अनेक महिलांनी शिवसेना शिंदे गटात जाहीर पक्ष प्रवेश केला. या वेळी शिवसेना जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, महिला जिल्हाप्रमुख कुंदा गोळे, महिला कळंबोली शहर प्रमुख ज्योती पाटील, कळंबोली शहर प्रमुख तुकाराम सरक, उपविधानसभा प्रमुख, पनवेल प्रशांत कदम, सी पी प्रजापती यांच्यासह अनेक महिला, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी रामदास शेवाळे यांनी बोलताना सांगितले की उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेची घोडदौड सगळीकडे सुरू आहे. अनेक ठिकाणी शिवसेनेत पक्षप्रवेश होत असल्याचे श्रेय एकनाथ शिंदे यांना जात असल्याचे त्यांनी सांगितले. पक्ष प्रवेश केलेल्या या महिलांचे शिवसेनेत स्वागत करण्यात आले.



**रसायनी : वावेघर नाला परिसरात कचऱ्याचा साठलेला ढीग लवकरात लवकर उचलावा, अशी मागणी स्थानिक करीत आहेत.** (छाया : बी.एस.कुलकर्णी)

## खारघर व कामोठे प्रभागात रस्ते दुरुस्तीच्या कामांना वेग

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कामोठे व खारघर प्रभागातील रस्ते दुरुस्तीची पाहाणीअतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या वेळी रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी खराब झालेल्या रस्त्यांची दुरूस्ती लवकरात लवकर करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानूसार अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे यांनी आज खारघर प्रभागातील कोपरा गावातील रस्त्यांची प्रत्यक्ष पहाणी केली. रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने करण्याबाबत संबधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या.

याचबरोबर कामोठे शहरातील प्रमुख रस्त्यांची पाहाणी केली.यावेळी महापालिका अधिकारी, कनिष्ठ अभियंता,संबधित ठेकेदार व कर्मचारी उपस्थित होते. या वेळी अतिरिक्त आयुक्तांनी चारही प्रभागातील रस्ते दुरुस्तीच्या कामाचा आढावा घेतला.

सध्या पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील चारही प्रभागातील रस्ते दुरूस्तीची कामे युध्द पातळीवर सुरू आहेत. यामध्ये, खारघर प्रभागात खारघर रेल्वे स्टेशन रोड, सेक्टर ६, उत्सव चौक ते गुरूद्वारा, शिल्प चौक, तळोजा गाव, कोयनावळे, पालेखुर्द, अशा विविध भागात रस्ते दुरूस्तीची कामे वेगाने केली जात आहे.नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंताशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



## फ्लॅट खरेदीदरम्यान १७ लाखांची फसवणूक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओमकारा प्राईड या इमारतीमध्ये फ्लॅट खरेदी करण्यास इच्छुक असणाऱ्या सहा ग्राहकांकडून १७ लाख तीन हजार रुपये घेऊन ती रक्कम कंपनीकडे जमा न करता रकमेचा अपहार केल्याप्रकरणी विनायक प्रभाकर लोखंडे (रा. कानसई, सेक्शन, अंबरनाथ पूर्व) याच्याविरोधात ११ नोव्हेंबर रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सुभाषु सुभाष बिस्वाल हे खारघर, सेक्टर २७ येथे राहत असून त्यांचे रियल इस्टेट क्षेत्रात काम करणारी कंपनी आहे. ते विविध बिल्डर्सने बांधलेले इमारतीतील फ्लॅट ग्राहकांना विकणे, मार्केटिंग करणे व जाहिरात करण्याची कामे करतात. घोटगाव येथे ओंकारा प्राईड ही बिल्डिंग निर्मणाधीन असून त्या बिल्डिंग मधील फ्लॅट विक्री करण्याचे कंत्राट त्यांच्या कंपनीला मिळाले. त्यांच्यात सामंजस्य करार झाला. त्यानुसार साईट हेड म्हणून विनायक प्रभाकर लोखंडे हा काम करत होता.

लोखंडे याने फ्लॅट खरेदी करण्यास इच्छुक असणाऱ्या सहा ग्राहकारांकडून एकूण १७ लाख तीन हजार रुपये घेतले, मात्र ते पैसे कंपनीला किंवा बिस्वाल याना कळवले नाही आणि ग्राहकांकडून घेतलेल्या पैशांचा अपहार स्वतःच्या फायद्यासाठी केला.

## १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर कालावधीत कुष्ठरुग्ण शोध अभियान

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार १७ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर २०२५ या कालावधीत कुष्ठरुग्ण शोध अभियान ही मोहीम नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात राबविण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली १८२ पथकांच्या माध्यमातून ७६ हजार १२६ घरातील ३ लाख ४१ हजार ३३९ लोकसंख्येला भेटी देण्यात येउन नागरिकांची तपासणी व जनजागृती करण्यात येणार आहे. प्रत्येक पथक दररोज ३० घरांना प्रभावीपणे भेट देऊन माहिती संकलीत करेल अशाप्रकारे पथके तयार करण्यात आली आहेत.

प्रत्येक पथकामध्ये एक महिला व एक पुरुष कर्मचारी असणार आहे. प्रत्येक घरातील महिलांची तपासणी महिला कर्मचाऱ्यांमार्फत आणि पुरुषांची तपासणी पुरुष कर्मचाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे. कुष्ठरोगाकरिता त्वचेवर फिकट/लालसर बधीर चट्टा, त्याठिकाणी घाम न येणे, जाड व बधीर तेलकट/चकाकणारी त्वचा, त्वचेवर गाठी असणे, कानाच्या पाळया जाड होणे, भुवयांचे केस विरळ होणे, डोळे पूर्ण बंद न करता न येणे अशा प्रकारची लक्षणे विचारुन तपासणी केली जाणार आहे. यामध्ये कुष्ठरोगाची लक्षणे आढळल्यानंतर वैद्यकिय अधिकारी यांच्याकडे निदानाकरीता संदर्भित करण्यात येणार आहे.

नमुंमपा कार्यक्षेत्रात शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार तपासणी कार्यक्षेत्राची निवड करण्यात आली असून यामध्ये झोपडपट्टी, बांधकाम मजूर, दगडखाणी इ. भागाचा समावेश करण्यात आला आहे. त्यानुसार तीन लाख ४१ हजार ३३९ लोकसंख्येमध्ये १८२ पथकांद्वारे मोहीम कालावधीत भेटी देण्यात येणार आहेत.

या अभियानामुळे समाजातील निदान न झालेले कुष्ठरुग्ण लवकरात लवकर शोधून त्यांना त्वरित बहुविध औषधोपचाराखाली आणणे, नवीन सांसर्गिक कुष्ठरुग्ण शोधून बहुविध औषधोपचाराद्वारे संसर्गाची साखळी खंडित करून होणारा प्रसार कमी करणे, कुष्ठरोग दुरीकरणाचे ध्येय साध्य करून कुष्ठरोग निर्मुलनाच्या दिशेने वाटचाल करणे हे उद्दीष्ट साध्य करण्यात येणार आहे.

## रानसई येथे शेती अवजारे आणि मच्छीमार बोटींचे लोकार्पण

**उरण : बातमीदार**

रानसई ग्रामपंचायत ही उरण तालुक्यातील १०० टक्के आदिवासी वस्ती असणारी ग्रामपंचायत आहे. याठिकाणी खैरकाठी, मार्गाचीवाडी, बंगल्याची वाडी, खोंड्याची वाडी, साग वाडी आणि भुऱ्याची वाडी अशा सहा आदिवासी वाड्या आहेत. या वाड्यामधील ४३० कुटुंबांना ओएनजीसी उरण प्लांटकडून प्रत्येकी एक फावडा, एक टिकाऊ, एक पहार एक घमेला, एक पंजा अशी सहा शेती अवजारे आणि पाच मच्छीमार आदिवासी ना विना यांत्रिकी बोटींचे लोकार्पण करण्यात आले.

या वेळी ओएनजीसी कडून भावना आठवले (जी एम हेड एचआर - इ आर), संजीव मोहन (सी जी एम सपोर्ट मॅनेजर), गौरव पतंगे (मॅनेजर एच आर), अभिषेक पाटील (सी एस आर ऑफिसर) तसेच साद फाउंडेशन संस्थेचेचे सर्व प्रमुख प्रतिनिधी कार्यकर्ते उपस्थित होते. रानसई येथील बहुतांशी आदिवासी कुटुंब हे भाजीपाला मोलमजुरी आणि मासेमारी व्यवसाय करून आपली उपजीविका करत आहेत त्यांना त्यांच्या रोजच्या वापरातील वस्तू मिळाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.



यापुढेदेखील विविध व्यवसायाच्या माध्यमातून येथील आदिवासींना रोजगार निर्माण होणार असेल तर नक्कीच आपण ओएनसीसीचे सी एस आर फंडातून प्रयत्न करू असे उपस्थित मान्यवर भावना मॅडम आणि संजीव मोहन यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

या वेळी रानसई ग्रामपंचायत चे सरपंच, उप सरपंच, सदस्य प्रमुख कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने आदिवासी ग्रामस्थ उपस्थित होते या कार्यक्रमाचे मार्गदर्शन कुलकर्णी सरांनी केले तर सूत्रसंचालन सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांनी केले.

## गव्हाण येथे रस्ता डांबरीकरण कामाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गव्हाण गावातील एमएसईबी ऑफिस ते बंदर रोड चार फाटा या महत्त्वाच्या रस्त्याच्या डांबरीकरणाच्या कामाला रविवारी औपचारिक सुरूवात झाली. रायगड जिल्ह्याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या स्वखर्चातून या रस्त्याचे डांबरीकरण करण्यात येत असून, या कामाचे भूमिपूजन पनवेल पंचायत समितीचे माजी सदस्य व ज्येष्ठ नेते भाऊशेठ पाटील आणि भाजप नेते



रतनशेठ भगत यांच्या हस्ते संपन्न झाले.

गव्हाण परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला हा मार्ग अनेक वर्षे जीर्ण अवस्थेत होता. पावसाळयात रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होत असल्याने वाहनधारकांना तसेच पायी जाणाऱ्या नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वतःच्या खर्चातून रस्ता विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. भूमिपूजन कार्यक्रमास भाजपचे नेते व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये भाजप वाहतूक सेलचे हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, अशोक कडू, प्रमोद कोळी, योगिता भगत, कामिनी कोळी, किरण देशमुख, हेमंत पाटील, विनायक कोळी, सदानंद देशमुख, अलंकार कोळी, विशाल कोळी, सुनील कोळी, कैलास कोळी, उषा देशमुख आदी मान्यवरांचा समावेश होते.

स्थानिक नागरिकांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केलेल्या मदतीसाठी कृतज्ञता व्यक्त केली.

## अनिल दाभाडे यांचा कविसंमेलनात सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

श्री. रामशेठ ठाकूर विकास मंडळ पनवेल आणि कोमसाप शाखा पनवेल नवीन पनवेल, पनवेल यांच्या वतीने भव्य अशा कविसंमेलनाचे आयोजन मंडळाच्या पनवेल येथील सभागृहात करण्यात आले होते.

या कविसंमेलनाला प्रमुख पाहुणे म्हणून लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, प्रसिद्ध हास्य कवी अशोक नायगावकर, प्रसिद्ध कवी गीतकार अरूण म्हात्रे तसेच सुप्रसिद्ध गझलकार ए.के.शेख पनवेल टाईम्सचे संपादक व कोमसाप नवीन पनवेलचे अध्यक्ष गणेश कोळी, माजी शिक्षण संचालक व गझलकार रोहिदास पोटे इत्यादी प्रमुख



पाहुणे म्हणून व्यासपीठावर हजर होते.

अशा या भव्यकविसंमेलनात रसायनी येथील साहित्यिक कवी लेखक चारोळीकार अनिल दाभाडे यांनी विविध विषयांवर चारोळ्या सादर केल्या.

उपस्थित रसिकांनी चारोळ्यांना टाळ्यांचा कडकडाट करून दाद दिली. या भव्यकविसंमेलनाचे निवेदन प्रज्ञा जाधव यांनी केले होते.



**उरण : नगर परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ६ येथून उभ्या असलेल्या महायुतीच्या उमेदवार स्नेहल भीमदास कासारे यांनी प्रचाराची दिशा आणि पुढील रणनीती याबाबत मार्गदर्शन मिळावे या हेतूने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची भेट घेतली. त्यांनी स्नेहल कासारे यांना शुभेच्छा देत प्रभागातील जनतेचा विश्वास जिंकण्यासाठी पारदर्शक आणि विकासाभिमुख कार्य करण्याचे मार्गदर्शन केले.**



**पनवेल : उलवे रहिवासी संघटनेच्या वतीने दिल्ली स्फोट मृत्यू झालेल्या नागरिकांना श्रद्धांजली वाहण्यात आली आणि दहशतवादी हल्ल्याचा निषेध करण्यात आला.**

## गव्हाण विद्यालयात आनंददायी शनिवार

### चित्रकला स्पर्धा आणि शैक्षणिक साहित्य निर्मितीचे उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे शनिवारी (दि.१५) इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांचा आनंददायी शनिवार उत्साहाने साजरा करण्यात आला.

इयत्ता आठवी अ, ब, क आणि ड या चारही तुकड्यांमधील विद्यार्थ्यांनी आनंददायी शनिवार उपक्रमात 'गांधीतीर्थ स्वच्छ शाळा' उपक्रमांतर्गत चित्रकला स्पर्धा आणि 'शैक्षणिक साहित्य निर्मिती' हे दोन उपक्रम राबविण्यात आले. आठवीच्या वर्गशिक्षिका श्रीमती शेलार एस. डी.,दर्शना माळी,वृषाली म्हात्रे



आणि कलाशिक्षक गणेश भोईर यांनी या उपक्रमाचे उत्तम नियोजन केले.

या वेळी विद्यार्थ्यांनी ग्राम स्वच्छता या विषयावर सुंदर चित्रे रेखाटली. तसेच अभ्यासक्रमावर आधारित विविध विषयांना अनुसरून शैक्षणिक तक्ते निर्मिती केली. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य निर्मितीचा आनंद मिळाला.

या वेळी विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिकला शशिकला पाटील यांनी या उपक्रमाला भेट देवून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## करावे शाळेत बाल दिन उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

माजी पंतप्रधान पंडित नेहरू यांच्या जयंतीचे औचित्य साधून करावे गावातील नवी मुंबई महानगरपालिकेच्या शाळा क्र. ६ मधील विध्यार्थ्यांनी विविध उपक्रम राबवून शुक्रवारी (दि. १४) रोजी बाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी, मुख्याध्यापकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून पंडित जवाहरलाल नेहरूंच्या प्रतिमेला अभिवादन केले. तर, विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होऊन वैज्ञानिक दृष्टीकोनातून कलात्मक प्रात्यक्षिके सादर केली.

या वेळी, विद्यार्थ्यांनी सुप्त गुणांची वाट मोकळी करत



सामाजिक विषयांवरील भाषण, आदिवासी समाजातील तारफा नृत्य, हास्यमय मनोरंजक खेळ, सुबक मेहंदी स्पर्धा, टॅटू' काढून रंग भरणे, यासह वारली पेंटिंग करून त्याचे प्रदर्शन भरवलं भरविण्यात आले. विशेष म्हणजे मराठमोळ्या संस्कृतीचे पारंपारिक खाद्यपदार्थांचे स्टॉलदेखील लावण्यात आले. या वेळी, शिक्षकांनी प्रोत्साहन देतं विध्यार्थ्यांचे कौतुक करून शाबासकीची थाप दिली. तसेच सदर कार्यक्रमाला शाळेतील शिक्षकावर्गाने सहकार्य केले.

बालदिन हा केवळ एक उत्सव नसून, मुलांच्या स्वप्नांना प्रोत्साहन देणे, त्यांचे बालपण जपणे आणि त्यांना स्वातंत्र्य व कल्पनाशक्तीने वाढण्यास मदत करण्याची आठवण करून देतो. समाजाची जबाबदारी आपल्याला शैक्षणिक कर्तव्याची आठवण करून, यातूनच आपण मुलांना प्रेम, काळजी आणि संरक्षण देऊन, पुढील भविष्य घडण्यासह मुलांचे शिक्षण, आरोग्य आणि खेळ सुधारण्यासारख्या त्यांच्या संपूर्ण विकासासाठी कार्य करण्याची प्रेरणा देत असल्याचे मत मुख्याध्यापक ठाकूर यांनी व्यक्त केले.

# अलिबागमध्ये तंबाखूमुक्त युवा अभियान रॅली

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय विधी सेवा दिन, बालदिन आणि तंबाखूमुक्त युवा अभियानाच्या निमित्ताने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग आणि जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. न्याय हा सर्वांचा मूलभूत हक्क आहे तसेच तंबाखूजन्य व्यसनापासून युवा पिढी दूर राहावी, हा दुहेरी संदेश या उपक्रमातून प्रभावीपणे देण्यात आला.




## राष्ट्रीय विधी सेवा दिन आणि बाल दिन उत्साहात

कार्यक्रमाच्या प्रारंभी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव तथा वरिष्ठ दिवाणी न्यायाधीश तेजस्विनी निराळे यांनी प्रास्ताविक करून समाजातील वंचित, दुर्बल आणि गरजू घटकांना न्यायाच्या उपलब्धतेबाबत जागृती करण्याची गरज अधोरेखित केली. न्याय हा अधिकार आहे, दान नाही हा संदेश रॅलीद्वारे प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहचवण्याचे आवाहन त्यांनी केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात जिल्हा न्यायाधीश-३ एस. डी. भगत यांनी राष्ट्रीय विधी सेवा दिनाचे महत्त्व स्पष्ट केले. दरवर्षी ९ नोव्हेंबर रोजी साजरा केला जाणारा हा दिवस समाजातील दुर्बल घटकांना मोफत कायदेशीर मदतीची माहिती देण्यासाठी महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले. कायदेशीर साक्षरता वाढणे ही लोकशाही बळकट होण्याची गुरुकिल्ली असल्याचाही त्यांनी उल्लेख केला.

रॅलीमध्ये जिल्हा न्यायालयातील न्यायाधीश, अलिबाग वकील संघाचे अध्यक्ष ॲड. प्रसाद पाटील, उपाध्यक्ष ए. डी. पाटील, सचिव ॲड. अमित देशमुख, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. निशिकांत पाटील, वकील वर्ग, न्यायालयीन कर्मचारी तसेच जे.एस.एम. कॉलेज, शासकीय मेडिकल कॉलेज, दत्ता पाटील लॉ कॉलेज, नर्सिंग कॉलेज आणि जनरल अरुणकुमार वैद्य हायस्कूल येथील २५० हून अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांनी कायदेविषयक आणि तंबाखूविरोधी घोषणाबाजी करत फलकांच्या माध्यमातून जनजागृतीचा संदेश दिला. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणामार्फत कायदेविषयक माहितीपत्रकेही वाटण्यात आली.

अलिबाग शहरातील मुख्य मार्गावरून निघालेल्या या रॅलीत नागरिकांना तंबाखूजन्य पदार्थांच्या दुष्परिणामांची माहिती देत तंबाखूमुक्त युवा, तंबाखूमुक्त भारत, बेटी बचाव बेटी पढ़ाव, बालकामगार बंद करा, असे संदेश देण्यात आले.

# जिल्हा युवा महोत्सव रंगला

**रायगड : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड-अलिबाग यांच्या वतीने आयोजित जिल्हा युवा महोत्सवाला युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. हा महोत्सव जे.एस.एम. कॉलेज, अलिबाग येथे जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश वाघ यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली पार पडला.

उद्घाटनावेळी उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके यांनी महोत्सवाच्या माध्यमातून युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळत असल्याचे सांगितले. परीक्षकांनीही युवकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांनी तर आभार प्रदर्शन सुचिता दमाले यांनी केले. सूत्रसंचालन किरण करंदीकर यांनी केले.

जिल्ह्यातील मोठ्या संख्येने युवक-युवतींनी विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेतला. त्यातील विशेष निकाल पुढीलप्रमाणे-



लोकगीत व लोकनृत्यमध्ये सीकेटी कॉलेज, पनवेल लोकगीत प्रकार: पारंपरिक कोळीगीत सादर करून प्रथम क्रमांक, लोकनृत्य प्रकार: छत्तीसगढचे आदिवासी नृत्य सादर करून प्रथम क्रमांक, प्रिझम संस्था, अलिबाग - द्वितीय क्रमांक, विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्प सादरीकरण प्रथम: मनस्व मधुकर थळे - पी.एन.पी. होली चाइल्ड CBSE स्कूल, अलिबाग, द्वितीय: सर्वेश शैशव सताळकर, तृतीय: स्निग्धा प्रसाद पाटील

कथालेखन प्रथम: आयेशा खलपे - पी.एन.पी. होली ४० CBSE स्कूल, द्वितीय: प्रणत शेडगे - सीकेटी कॉलेज पनवेल, तृतीय: विवेक दास - पी.एन.पी. होली ४० CBSE स्कूल, चित्रकला स्पर्धा प्रथम: सानिया नितीन म्हात्रे - पी.एन.पी. ज्युनियर कॉलेज, द्वितीय: कशिश गणेश तिखे - सीकेटी कॉलेज पनवेल, वक्तृत्व स्पर्धा, प्रथम: संयोगी राजेंद्र नाईक - जे.एस.एम. कॉलेज अलिबाग, द्वितीय: वेदांत दिलीप कंटक - डॉक्टर उ.ऊ देशमुख कॉलेज, रोहा, कविता लेखन प्रथम: अनुष्का कोकणे - सीकेटी कॉलेज पनवेल, द्वितीय: प्रणव शेडगे - सीकेटी कॉलेज पनवेल, तृतीय: समृद्धी म्हात्रे - PNP SCS कॉलेज एकूण ३३ विजेते युवक-युवती विभागीय स्पर्धेसाठी निवडण्यात आले.

# मध्य रेल्वेत ८१८४ गुन्हेगारांना अटक

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या रेल्वे सुरक्षा दलावर रेल्वे मालमत्तेची, रेल्वे स्थानकांची आणि गाड्यांमधील आणि स्थानक परिसरात प्रवाशांची सुरक्षा करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. रेल्वेला गैरमार्गी घटकांपासून मुक्त ठेवण्यासाठी, आरपीएफने त्यांच्या गुप्तचर विभागाला मिळालेल्या माहितीच्या आधारे अनेक छापे टाकले आहेत.



ऑक्टोबर-२०२५ महिन्यात, मध्य रेल्वे आरपीएफने रेल्वे कायद्याच्या विविध कलमांखाली ८१८४ गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर खटला चालवला आहे. दंड म्हणून गुन्हेगारांकडून ३८.०३ लाख रुपये वसूल करण्यात आले आहेत.

यामध्ये महिलांसाठी राखीव असलेल्या डब्यातून प्रवास केल्याबद्दल रेल्वे कायद्याच्या कलम १६२ अंतर्गत २४३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि दंड म्हणून ६२,२०० रुपये वसूल करण्यात आले आहेत.

रेल्वे मालमत्तेची चोरी केल्याबद्दल रेल्वे मालमत्ता (बेकायदेशीर ताबा) कायद्याअंतर्गत ५९ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे आणि चोरीच्या वस्तूंसह दंड म्हणून ४.६२ लाख रुपये वसूल करण्यात आले आहेत. ८.२१ लाख रुपये किमतीची दारू, गांजा आणि तंबाखूजन्य पदार्थ बेकायदेशीरपणे बाळगल्याबद्दल १७ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रवाशांच्या सामानाची चोरी आणि प्रवाशांविरुद्धच्या इतर गुन्ह्यांसाठी १६१ जणांना अटक करण्यात आली आहे.

# लांबलेल्या पावसाने पेढ्यांचे नुकसान

**तळा : प्रतिनिधी**

हवामानातील बदल व यावर्षी लांबलेल्या पावसामुळे भातशेतीचे मोठ्याप्रमाणात नुकसान झाले असून कापणी झालेली भातशेती पावसाने कुजून गेली तर काही ठिकाणी कापणी ही करता आली नाही. त्यामुळे पेंढ्याचे नुकसान झाले आहे.


गुरांच्या वैरणीचा प्रश्न गंभीर
(संग्रहीत छायाचित्र)

काही राहीलेला भातशेतीत पिकाची मोठ्याप्रमाणात कापणी, बांधणी व झोडणीची कामे जोरात सुरू आहेत, मात्र त्यापिकांमधेही नुकसान झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. या उशीरापर्यंत पडलेल्या पावसामुळे पिकाबरोबरच पेंढाही कुजून गेल्याने पेंढा राहीला नाही.

पेंढा न राहील्याने गुरांच्या वैरणीचा प्रश्न समोर आला आहे. एकदा पावसाळा संपला की कापणी होऊन झोडणी झाल्यानंतर गुरांच्या वैरणीसाठी पेंढा साठवण करून ठेवला जातो. हा पेंढा वर्षभराची वैरण असते. ही वैरण साठवण न झाल्याने येत्या काळावधीपासून पासून गुरांना चारा कसा व कोठून उपलब्ध करायचा हा प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे.

काही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, एकीकडे पिकांचे नुकसान झाले आणि आता गुरांच्या संगोपनासाठीही अडचणी वाढल्या आहेत. वैरणी अभावी पशुधन टिकविणे कठीण होणार आहे.

# जिल्ह्यात नोंदणीविना कार्यरत दिव्यांग संस्थांवर होणार कारवाई

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात दिव्यांग क्षेत्रात नोंदणी न करता कार्यरत असलेल्या संस्थांवर कठोर कारवाई करण्यात येणार आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार, अशा संस्थांसाठी नोंदणी करणे अत्यावश्यक असून ३० नोव्हेंबर २०२५ ही अंतिम मुदत दिली आहे.

७ नोव्हेंबर २०२५ रोजी दिव्यांग विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत, दिव्यांग क्षेत्रात कार्यरत सर्व संस्थांची अधिकृत नोंदणी अनिवार्य असल्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. संबंधित संस्थांनी आपला नोंदणी प्रस्ताव जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी कार्यालयाकडे सादर करावा.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ५१ व ५२ अन्वये नोंदणी करणे बंधनकारक असून, नोंदणी न केलेल्या संस्थांवर कलम ९१ नुसार दंडात्मक कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे. जिल्हा प्रशासनाने सर्व दिव्यांग सेवा देणाऱ्या संस्थांना ३० नोव्हेंबर २०२५ पूर्वी नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

# गव्हर्निंग कौन्सिलच्या सदस्यपदी मंगेश नेने

**पेण : प्रतिनिधी**

कास्प संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत ॲड. मंगेश नेने यांची सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. शैक्षणिक व सामाजिक कार्यातील त्यांच्या भरीव कामगिरीमुळे ही निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे संस्थेच्या कार्यात नवीन उर्जा आणि दिशा मिळेल असा, विश्वास व्यक्त केला जात आहे.



या निवडणुकीत माजी पोलीस महासंचालक जयंत उमराणीकर यांची गव्हर्निंग कौन्सिलच्या अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे तसेच, भाग्यश्री डेंगळे यांची उपाध्यक्षपदी आणि निवेदिता दासगुप्ता यांची सदस्य म्हणून बिनविरोध निवड झाली आहे. ॲड. मंगेश नेने याची गव्हर्निंग कौन्सिलच्या पदी बिनविरोध निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# वडगाव शाळेत जनजातीय गौरव कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे जनजातीय गौरव कार्यक्रम झाला.

रायगड जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा वडगाव येथे शासन निर्देशानुसार भगवान बिरसा मुंडा जन्मशताब्दी वर्षानिमित्त १ ते १५ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत जनजाती गौरव पंधरवडा साजरा केला जात आहे. या निमित्ताने शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे व आदिवासी नृत्याचे आयोजन करण्यात आले होते. यात सर्व इयत्ताच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन सुंदर सादरीकरण केले. या वेळी वडगाव आदिवासी वाडीतील ग्रामस्थ, पालक उपस्थित होते. या वेळी शिक्षक वैजनाथ जाधव यांनी वारली चित्रकला विषयी मार्गदर्शन केले.

मुख्याध्यापक सुभाष राठोड यांनी भारतातील जनजाती विषयी मार्गदर्शन करत त्यांचा सांस्कृतिक वारसा मांडला. तसेच भगवान बिरसा मुंडा यांचा अबुआ राज एते जाना, महारानी राज टुंडू जानाब हा नारा व त्यांचा जल जंगल आणि जमीन यासाठीचा संघर्ष विद्यार्थ्यां सांगितला. उत्साही व आनंददायी वातावरणात कार्यक्रमाची सांगता झाली. या वेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा राजश्री जांभुळकर, अंगणवाडी सेविका नीता राऊत, स्वयंसेवक संकेत काठोळे, संचिता गडगे, शिक्षक वैजनाथ जाधव व मुख्याध्यापक सुभाष राठोड आदी उपस्थित होते.



# काकळघर येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील काकळघर ग्रा.प. हद्दीतील काकळघर येथे सामाजीक सभागृह, नळपाणी योजना व नुतन रस्ता कामांचे भूमिपूजन कार्यक्रम काकळघर ग्रामस्थ व महिला यांचे वतीने शुक्रवारी सरपंच स्वस्तिक ठाकूर, व शिवसेना नेते सि.एम.ठाकूर यांचे नियोजनात करण्यात आले होते.



या वेळी आमदार महेंद्र दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती, तर शिवसेना उपजिल्हा प्रमुख भरतशेठ बेलोसे, शिवसेना मुरूड तालुका प्रमुख निलेश घाटवळ, शिवसेना जिल्हा महिला प्रमुख तृप्ती पाटील, संगिता कणगी, युवासेना मुरूड तालुका प्रमुख अमोल लाड, युवासेना उपतालुका प्रमुख विकी वेगस तालुका संघटक यशवंत पाटील, दिनेश मिनमिने,सरपंच संतोष राणे, सरपंच विजय घाणेकर, सतेज ठाकूर, माजी सरपंच सुचिता पालवणकर, माजी सरपंच साक्षी गायकवाड, अरविंद गायकर, मधुकर पाटील, विभाग प्रमुख सुरेश ठाकूर, सुधीर चेरकर, गजानन बुढके, संतोष कांबळी, आदी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांचेसह मोठया संख्येने काकळघर ग्रामस्थ व महिला यांची उपस्थिती होती.

काकळघर येथे श्री मरीआई माता मंदिरासाठी सामाजीक सभागृह २५ लाख रूपये, नळपाणी योजना १२ लाख रूपये व काकळघर अंतर्गत रस्ता सहा लाख रूपये निधी काकळघर ग्रामस्थांचे मागणीने सरपंच स्वस्तिक ठाकूर यांचे प्रयत्नाने आमदार महेंद्र दळवी यांच्या विकास निधीतून उपलब्ध करण्यात आले आहे. आमदार महेंद्र दळवी यांचे हस्ते कुदळ मारून श्री मरीमाता मंदिर सामाजीक सभागृह भुमिपुजन तसेच सरपंच स्वस्तिक ठाकूर यांचे हस्ते श्रीफळ वाढवून नळपाणी योजना कामाचे भुमिपुजन, व ग्रामस्थ काकळघर यांचे हस्ते नुतन रस्ता बांधकामाचे भुमिपुजन करण्यात आले.

काकळघर ग्रामस्थांचे वतीने उपसरपंच निशांत दांडेकर, वैभव वादळ, सुनील केंद्रे, रघुनाथ कांबळे यांनी आमदार महेंद दळवी यांचा सत्कार शाल, श्रीफळ व पुष्पगूच्छ प्रदान करून केले. या वेळी मुरूडचे अरविंद गायकर यांच्या विशेष सत्कार आमदार महेंद्र दळवी यांनी केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सुनील केंद्रे, व रघुनाथ कांबळी यांनी केले.

# उतेखोलवाडी शाळेत बाल दिन उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव नगरपंचायत हद्दीतील राजिप पीएमश्री उतेखोलवाडी शाळा येथे शुक्रवारी (दि.१४) बालदिन उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच या वेळी शाळेत निपुण भारत कार्यक्रमही साजरा करण्यात आला.

या बालदिनाच्या औचित्य साधून सामाजिक, शैक्षाणिक क्षेत्रात आग्रेसर असणाऱ्या माणगाव चारिझेन फाउंडेशनतर्फे राजिप पीएमश्री उतेखोलवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात येऊन फाउंडेशनने बाळगोपाळ विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित केला.

या कार्यक्रमात राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार, चारिझेन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कॅप्टन निर्मलसिंग रंधावा, फाउंडेशनचे मार्केटिंग हेड राकेश पडवळ, केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांनी फाउंडेशन राबवित असलेल्या विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रमांची माहिती देऊन उपस्थित बाळगोपाळांना बालदिनाच्या शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास फाउंडेशनचे उपाध्यक्ष सतीश काळे, सदस्य किशोर झेमसे, शाळेच्या मुख्याध्यापिका शोभा तालिमकर, व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष जागृती बुटे, संस्कृती उभारे, शुभांगी काळे, साधना खराडे, शाळेचे शिक्षकवर्ग, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# चौकमध्ये जनजाती गौरव दिन उत्साहात साजरा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालय चौक शाळेत भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती 'जनजाती गौरव दिन' म्हणून मोठ्या उत्सवात साजरा केला.

विद्या प्रसारिणी सभा चौक संस्थेचे सचिव योगेंद्र भाई शहा यांनी भगवान बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमास सुरुवात केली पाहुण्यांचे स्वागत पूजा निरगुडा, सिद्दी वाघे, मनिषा वाघमारे या मुलींनी पुष्पगुच्छ देऊन केले. नववी अ ची विद्यार्थिनी कुमारी श्राव्या मोरे आणि इंग्लिश शिक्षक हरेश पडवळ यांनी मनोगत व्यक्त केले. तर योगेंद्र भाईंनी भगवान बिरसा मुंडांचे कार्य आपल्या भाषणातून व्यक्त केले.

या कार्यक्रमाला मुख्याध्यापक रमेश गायकवाड सर उपमुख्याध्यापिका योजना म्हात्रे मॅडम आणि सर्व शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल काळे सर यांनी केले व सतीश बांबळे यांनी मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानले.

# प्रा. स्नेहल कांबळे यांना रसायनशास्त्राची पीएचडी

**पेण : प्रतिनिधी**

पेण एज्युकेशन सोसायटी ही ११५ वर्षांपासून शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे. प्राथमिक शिक्षणा पासून ते उच्च शिक्षणापर्यंत शिक्षणाची सोय या संस्थेने पेणसारख्या ग्रामीण भागात उपलब्ध करून दिली आहे. या संस्थेत भाऊसाहेब नेने महाविद्यालय येथे प्राचार्य म्हणून कार्यरत असलेले प्राचार्य डॉ सदानंद भास्कर धारप यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. स्नेहल सुशील कांबळे यांनी मुंबई विद्यापीठाची रसायनशास्त्र विषयातील उच्चतम पदवी विद्यावाचस्पती (पीएचडी) मिळविली आहे.

भाऊसाहेब नेने महाविद्यालय पेण येथे गेले दहा वर्षांपासून रसायनशास्त्र विषयातील संशोधन केंद्र सुरू आहे. याच विषयात पदव्युत्तर पदवीचे शिक्षणही मिळते. हे संशोधन केंद्र हे तत्कालीन अध्यक्ष ॲड बापुसाहेब नेने व त्यांचे सहकारी यांचे प्रेरणेने सुरू झाले. तसेच सध्याचे अध्यक्ष ॲड. मंगेश नेने व त्यांचे कार्यकारीणीतील सर्व सहकारी यांच्या प्रोत्साहनामुळे प्रगती पथावर आहे. या विद्यार्थ्यीनीचे व तिचे संशोधन मार्गदर्शक प्राचार्य



डॉ. सदानंद भास्कर धारप यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

या यशामध्ये रसायनशास्त्र विभागातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी महाविद्यालयांतील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालय प्रमुख आणि पेण एज्युकेशन संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.रविंद्र कुलकर्णी, प्र.कुलगुरु डॉ. अजय भामरे यांचेही सहकार्य लाभले असे मत मार्गदर्शक प्राचार्य डॉ सदानंद भास्कर धारप यांनी सांगितले. भविष्यात अनेक विद्यार्थ्यांना हे यश मार्गदर्शक ठरेल, अशी भावना व्यक्त केली.

# टीम इंडियाचा लाजिरवाणा पराभव

## कोलकाता कसोटी द. आफ्रिकेने जिंकली

**कोलकाता : वृत्तसंस्था**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्याच लढतीत भारतीय संघाला ३० धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. कोलकाताच्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर झालेल्या या सामन्याच्या तिसऱ्याच दिवशी टीम इंडियाला चौथ्या डावात विजयासाठी केवळ १२४ धावांचे लक्ष्य मिळाले होते, मात्र भारतीय संघाचा दुसरा डाव ९३ धावांवर संपुष्टात आला आणि दारुण पराभव पत्करावा लागला.



भारतीय संघाने पहिल्या डावात ३० धावांची आघाडी घेतली होती, परंतु दक्षिण आफ्रिकेने पुनरागमन केले आणि गोलंदाजांवर अवलंबून राहून भारताला पराभूत केले. यासह त्यांनी दोन सामन्यांच्या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिका १५३ धावांवर सर्वबाद झाली आणि १२३ धावांची आघाडी घेऊन त्यांनी भारतासमोर १२४ धावांचे लक्ष्य ठेवले. भारतीय फलंदाजांच्या हाराकिरीमुळे दुसरा डाव ९३ धावांवरच आटोपला.

भारताचे सलामीवर यशस्वी जैस्वाल (०) आणि केएल राहुल (१) स्वस्तात माघारी परतले. दोघांनाही मार्को जानसेनने बाद केले. आयडेन मार्करामने वॉशिंग्टन सुंदरचा अडसर दूर केला. ९२ चेंडूत ३१ धावा काढून सुंदर बाद झाला. यानंतर भारताला अक्षर पटेलच्या रूपात मोठा धक्का बसला. तो १७ चेंडूत २६ धावा काढून बाद झाला.

दुसऱ्या डावातही भारताकडून कर्णधार शुभमन गिलने फलंदाजी केली नाही. भारताकडून वॉशिंग्टन आणि अक्षरव्यतिरिक्त रवींद्र जडेजा १८, ध्रुव जुरेल १३, ऋषभ पंत २ आणि कुलदीप यादवने १ धावा केली. केशव महाराजने मोहम्मद सिराजला बाद करून भारताचा डाव संपवला. जसप्रीत बुमराह खाते न उघडता नाबाद राहिला. दक्षिण आफ्रिकेकडून सायमन हार्मरने चार, तर मार्को जानसेन आणि केशव महाराज यांनी प्रत्येकी दोन बळी घेतले. एडेन मार्करामने एक गडी बाद केला.

### डब्ल्यूटीसी गुणतालिकेत भारतीय संघाची घसरण

दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्याच लढतीत भारतीय संघाला पराभवाला सामोरे जावे लागले. या पराभवामुळे भारतीय संघाला वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या (डब्ल्यूटीसी) चौथ्या पर्वातील गुणतालिकेत मोठा झटका बसला आहे. टीम इंडिया थेट चौथ्या क्रमांकावर घसरली आहे. द. आफ्रिकेविरुद्धची दोन सामन्यांची कसोटी मालिका सुरू होण्यापूर्वी टीम इंडिया डब्ल्यूटीसी २०२५-२७च्या गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर होती. कोलकाता कसोटीतील पराभवानंतर भारतीय संघाचे स्थान आता चौथ्या क्रमांकावर आले आहे, तर द. आफ्रिकेचा संघ चौथ्या स्थानावरून थेट दुसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे.

# राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत नमुंपाचे शाहू महाराज विद्यालय उपविजेते

## आशिष गौतम, ओंकार सावंत महाराष्ट्राच्या संघात

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका संचलित पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय, रबाळे या नवी मुंबईतील १७ वर्षे मुलांच्या संघाने राज्यस्तरीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धेत उपविजेतेपद पटकाविले. विद्यालयातील खेळाडू आशिष गौतम व ओमकार सावंत यांची महाराष्ट्राच्या संघात राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.



स्पर्धा अहिल्यानगर जिल्ह्यातील बाणेश्वर विद्यालय, बुरहाणनगर येथे झाली. राज्याच्या प्रशासकीय आठ विभागातील मुले व मुली असे एकूण १६ संघ स्पर्धेत सहभागी झाले होते. स्पर्धा साखळी व बाद पद्धतीने खेळवण्यात आली. यामध्ये शाहू महाराज विद्यालय रबाळे यांनी सुरुवातीला पुणे विभाग, नागपूर विभाग, अमरावती विभाग या संघाना मोठ्या फरकाने पराभूत करून गटात वर्चस्व गाजवले. उपांत्य फेरीमध्ये धाराशीव विभागाला नमवून अंतिम सामन्यात धडक दिली. अंतिम सामना कोल्हापूर विभागासोबत अत्यंत अटीतटीचा झाला व त्यांनी निसटता विजय मिळवला.

उपविजेतेपद पटकावलेल्या संघातील आशिष गौतम, ओंकार सावंत, अजिंक्य शिंदे, रोहित राठोड, आशिष रत्नाकर, करन गुप्ता, बसवराज कंपापूर यांनी उत्तम खेळ करत चांगली कामगिरी बजावली. या संघाला प्रशिक्षक प्रताप शेलार, मनोज पवार, स्वप्नील पाटील, रविराज परमणे, क्रीडा शिक्षक प्रा.अमोलकुमार वाघमारे, दिनेश भोये, कमलेश इंगळे, योगेश राज यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल माजी महापौर सुधाकर सोनवणे, रंजना सोनवणे, मुख्याध्यापक अमोल खरसंबळे, स्नेहल विशे, केंद्र समन्वयक अविनाश जाधव व इतरांनी खेळाडू व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले.

# 'आरडीसीए'च्या स्पर्धेत अलिबाग संघ अंतिम फेरीत

**अलिबाग : प्रतिनिधी**

जगदीश क्रिकेट अकॅडमी अलिबाग संघाने रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए) आयोजित १४ वर्षाखालील मुलांच्या एकदिवसीय ४० षटकांच्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. या संघाने उपांत्य फेरीच्या सामन्यात पनवेल क्रिकेट स्पोर्ट्स अकॅडमी संघावर दणदणीत विजय मिळवला.

प्रथम फलंदाजीला आलेल्या पनवेल संघाने ४० षटकांत १० गडी बाद ११९ धावा फलकावर नोंदवल्या होत्या. त्यामध्ये कर्णधार देव सिंग याने सर्वाधिक ३२, तर शौर्य घरतने ३० धावांचे योगदान दिले. अलिबाग संघाकडून यश पाटीलने तीन, तर हर्षित सिंग, स्वराज चौगुले यांनी प्रत्येकी दोन फलंदाज बाद केले.

अलिबाग संघाने ३५व्या षटकात चार गडी गमावत लक्ष्य पूर्ण केले. सलामीवीर ओम कावळे याने नाबाद ८१ धावा काढून संघाला सामना एकहाती जिंकून दिला. अंतिम फेरीत अलिबागचा सामना रोशन क्रिकेट अकॅडमी कामोठे संघाबरोबर आहे.

# महाराष्ट्र वि. ओडिशा सामन्याला रिलायन्स नागोठणे मैदानावर सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

रिलायन्स कंपनीच्या नागोठणे येथील क्रिकेट स्टेडियम मैदानावर रविवारी (दि.१६) महाराष्ट्र विरुद्ध ओडिशा या कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील सामन्याचा शुभारंभ झाला. ही स्पर्धा भारतीय क्रिकेट नियामक मंडळाद्वारे (बीसीसीआय) तर्फे आयोजित केली जाणारी १९ वर्षांखालील खेळाडूंसाठीची एक महत्त्वाची राष्ट्रीय चार दिवसीय क्रिकेट स्पर्धा आहे.

कूच बिहार ट्रॉफी



रिलायन्स नागोठणे विभागाचे अध्यक्ष शशांक गोयल, युवा नेते तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन (आरडीसीए)चे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, सचिव प्रदीप नाईक, सामना अधिकारी विनीत विओला, रिलायन्सचे जनसंपर्क अधिकारी रमेश धनावडे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामन्याला सुरुवात करण्यात आली.

या वेळी ज्येष्ठ व्हिडीओ विश्लेषक सदानंद प्रधान यांनी बीसीसीआयसाठी १८ वर्ष यशस्वीरित्या सेवा पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला तसेच सामना अधिकारी, पंच, गुणलेखक व सामना यशस्वी करण्यासाठी मेहनत घेणाऱ्या प्रत्येक विभागाच्या प्रतिनिधींचा सामना सुरू होण्यापूर्वी मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

कूच बिहार क्रिकेट स्पर्धेतील महाराष्ट्र वि. ओडिशा हा साखळी फेरीतील सामना असून सामना १६ ते १९ नोव्हेंबर असा चार दिवसीय आहे. या सामन्यासाठी रिलायन्स नागोठणे प्रशासनाकडून जय्यत तयारी व व्यवस्था करण्यात आली आहे.

रिलायन्स कॉर्पोरेट सर्व्हिसेसचे प्रमुख पुनीत मिश्रा, हॉर्टिकल्चर विभागाचे प्रमुख शरद पवार, सदस्य शांताराम करंजे, सिव्हिल डिपार्टमेंटचे प्रतिनिधी इस्माईल पिट्टू, विद्युत विभागाचे प्रतिनिधी राशिद दापोलकर, आरडीसीएचे उपाध्यक्ष राजेश पाटील, खजिनदार प्रशांत ओक, सहसचिव जयंत नाईक, सदस्य ॲड. पंकज पंडित, शंकर दळवी, सुयोग चौधरी, संदीप जोशी, रवी सोलंकी, डॉ. राजाराम हुलवान, मिलिंद मांढरे, रोहित कार्ले उपस्थित होते.

# महात्मा फुले महाविद्यालयाच्या पार्थ मानेचा 'सुवर्ण'वेध

## राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड, तर भावेश शिगवण मुंबई खो-खो संघात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या पनवेल येथील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील पार्थ राकेश माने याने मुंबई विद्यापीठ आयोजित मुंबई झोन क्र. १च्या ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली. या कामगिरीमुळे त्याची राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.





याशिवाय कला शाखेतील भावेश शिगवण या खेळाडूची निवड आंतरविभागीय स्पर्धेत मुंबई झोन १च्या खो-खो संघात निवड झाली आहे. भावेशला प्रशिक्षक हर्षद पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

या खेळाडूंच्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, जे.एम. म्हात्रे, महेंद्र घरत, अरुणशेठ भगत, महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष परेश ठाकूर, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, उपप्राचार्य डॉ. राजाराम पाटील व डॉ. लक्ष्मण गवळी यांच्यासह प्राध्यापक, जिमखाना कमिटीतील पदाधिकारी, सदस्यांनी अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.




**पनवेल : टीआयपीएल रोटरी प्रीमियर लीग पाचव्या पर्वाच्या अंतिम क्रिकेट सामन्यास आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली. वेंगसकर क्रिकेट अकॅडमी, नवीन पनवेल येथे आयोजित या भव्य क्रिकेट स्पर्धेने तरुणाईत खेळभावना, शिस्त आणि सांघिक एकतेची नवीन ऊर्जा निर्माण केली. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आयोजकांकडून स्वागत व सन्मान करण्यात आला, तर त्यांनी उत्कृष्ट आयोजनासाठी रोटरी क्लबचे अभिनंदन केले.**

# अखिल भारतीय कराटे चॅम्पियनशिपमध्ये सेंट विल्फ्रेड स्कूलच्या विद्यार्थ्यांचे यश

**रसायनी : प्रतिनिधी**

पंजाबमधील अमृतसर येथे झालेल्या अखिल भारतीय कराटे डो चॅम्पियनशिप २०२५मध्ये पनवेलच्या शेडुंग येथील सेंट विल्फ्रेड स्कूलच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींनी घवघवीत यश संपादन केले.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध शाळांमधून अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते. यात सेंट विल्फ्रेड स्कूलची सानवी जालरिया हिने कुमिते आणि सब ज्युनिअर मुलींच्या गटात काता या प्रकारात सुवर्णपदक प्राप्त केले. जयदीप गिरी याने १३ ते १५ वर्ष वयोगटातील कॅडट्स कुमितेमध्ये रौप्य, १० ते १२ वर्षे वयोगटातील सब ज्युनिअर कातामध्ये रौप्य, नियती घावरी हिने सब ज्युनिअर कुमितेमध्ये कांस्य, आदित्य घाडगे याने १० ते १२ वयोगटातील सब ज्युनिअर कुमितेमध्ये रौप्य, तर मोक्ष भारद्वाजने १३ ते १५ वर्ष वयोगटातील कॅडेट कुमितेमध्ये कांस्यपदक जिंकले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक केशव बढाया, मुख्य कार्यकारी अधिकारी मंजुळा वेणुगोपाल, सीबीएससी बोर्डाच्या मुख्याध्यापिका प्रीती सिंह, महाराष्ट्र स्टेट बोर्डाच्या क्रीडा विभागातील प्रशिक्षक गुरुप्रीत सिंह यांनी अभिनंदन केले.




# कोल्हापूरच्या सोंडोलीत आज दोन 'महाराष्ट्र केसरीं'ची दंगल; देवा थापा खास आकर्षण

**कोल्हापूर** : श्री नायकेश्वर देवाच्या यात्रेनिमित्त कोल्हापूरच्या शाहूवाडीतील सोंडोलीत १७ नोव्हेंबर रोजी भव्य 'रोज मर्क केसरी' आणि 'सोंडोली केसरी' कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने पृथ्वीराज पाटील आणि हर्षवर्धन सदगीर हे महाराष्ट्र केसरी एकमेकांशी भेटणार आहेत. त्याचप्रमाणे नेपाळी कुस्तीपटू देवा थापा या स्पर्धेचे खास आकर्षण असेल.

या दंगलीत दोन महाराष्ट्र केसरीमध्ये पहिल्या नंबरची कुस्ती मुख्य कुस्ती खेळली जाणार आहे. पाटील आणि सदगीर यांच्यात होणाऱ्या या लढतीत विजेत्याला 'रोज मर्क केसरी' आणि रोज मर्क लि.तर्फे मानाची चांदीची गदा आणि रोख पारितोषिक देऊन सन्मानित केले जाणार आहे.

स्पर्धेचे खास आकर्षण म्हणजे नेपाळचा लोकप्रिय आणि ताकदवान पैलवान देवा थापा विरुद्ध भारताचा आक्रमक पैलवान अमित लाखा यांची लढत आहे. याशिवाय 'सोंडोली केसरी' ही कुस्तीदेखील रंगणार आहे. या लढतीत महाराष्ट्र चॅम्पियन सतपाल सोनटक्के विरुद्ध समीर शेख अशी प्रेक्षकांना थरारक झुंज पहायला मिळेल.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **—मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com